

# चैतन्य लहरी

मे - जून २००७ अंक क्र. ५/६





















# श्रीमाताजींचे कबेला आगमन, २२ एप्रिल २००७







## अनुक्रमणिका


- श्रीमाताजींचे कबेल्याला आगमन,२२ एप्रिल,२००७ इटली ........ २
- आमच्या भाग्यशाली भगिनी,२७ एप्रिल २००७,इटली ........ २
- श्रीमाताजींच्या प्रेमळ सहवासातील आनंदी क्षण,दिनांक १मे,२००७,इटली ........ ३
- 'कबेल्यातील डोंगरदऱ्यांमध्ये श्रीमाताजींच्या सान्निध्यातील एक दिवस' कबेला दिनांक २० मे २००७ ........ ४
- श्रीमाताजींच्या महालामधील इटालीयन मदर्स डे, दिनांक ८ मे,२००७ ........ ५
- आई सोबतची एक अविस्मरणीय खरेदीसहल,१२ मे, २००७, इटली ........ ५
- श्रीमाताजींच्या सहवासात युवाशक्ती,२८ मे, २००७ इटली ........ ६
- आमच्या प्रिय आईसोबत घालविलेले काही सुंदर क्षण, २४ एप्रिल २००७, इटली ........ ७
- सहस्रार पूजा, ६ मे, २००७,इटली ........ ७
- लहान मुलांसोबतचा कार्यक्रम, २९ एप्रिल, २००७, इटली ........ ८
- एकत्र कुटुंबामधील आनंद - कल्पनादीदी सोबतचा दिवस, दिनांक ७ जून २००७, इटली ........ ८
- श्रीमाताजींच्या सहवासातील न विसरणारा वाढदिवस समारंभ,१६ जून २००७, इटली ........ ९
- पक्के सहजयोगी आहात,दिनांक १५ जून, २००७ इटली ........ ९
- श्रीमाताजींविषयी दैवी अनुभव ........ १०
- तत्वज्ञानाचा संदेश ........ १२
- श्रीललितासहस्रनामस्तोत्रातील काही श्लोकांचा अर्थ ........ १५


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, **''निर्मल ट्रान्स्फॉरमेशन प्रा.लि.पुणे''** या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD, PUNE 411 038. TEL. 020 25286537

## श्रीमाताजींचे कबेल्याला आगमन

२२ एप्रिल,२००७ इटली (ई मेल वृत्तांत)

श्रीमाताजींच्या परत एकदा आगमनाने इटलीची जमीन चैतन्यमय झाली. गेले काही दिवस बोरबेरा व्हॅलीच्या तळपत्या उन्हामध्ये सर्व सहजयोगी श्रीमाताजींच्या आगमनाची तयारी करीत होते. श्रीमाताजींच्या आगमनाने अचानक कबेल्याचे वातावरण ढगाळ झाले.त्यावेळी विजांच्या प्रकाशात, ढगांच्या गडगडातात , थोड्याशा पावसाच्या सरीने श्रीमाताजींचे कबेल्यात स्वागत केले.

श्रीमाताजींनी निर्मलनगरीमधील आतुरतेने वाट पहाणाऱ्या सहजयोग्यांना दर्शन दिले. श्रीमाताजींच्या कारसमोर युवाशक्तीनी श्रीमाताजी घरामध्ये पोहचेपर्यंत नृत्य सादर केले. त्यावेळी श्रीमाताजींना फुले अर्पण करून तसेच खाद्य पदार्थ व भेट वस्तू देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांच्या समोर कव्वालीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर श्रीपापाजीं 'घरी येऊन बरे वाटले' असे म्हणाले.त्यानंतर श्रीमाताजींनी आपल्या कबेल्यामधील अॅबोटू ला प्रस्थान केले. श्रीमाताजींच्या दर्शनाने व आशीर्वादाने सर्वांचे आत्मे आनंदमय झाले.

श्रीमाताजींच्या महालाभोवती सुंदर अशी खूप सारी फुले उमलली होती. जसे काही त्यांचे सौदर्य श्रीमाताजीस अर्पण केले. जेव्हा श्रीमाताजींनी महालात प्रवेश केला तेव्हा लहान मुलांनी त्यांच्यासमोर फुलांच्या पाकळ्या वाहिल्या.

● ● ●

## आमच्या भाग्यशाली भगिनी

२७ एप्रिल २००७,इटली (ई मेल वृत्तांत)

इथे आईच्या स्वयंपाकगृहामध्ये आमच्या भगिनीं आमच्या परमेश्वरी आईसाठी इतक्या प्रेमाने इतकी काळजी घेऊन अन्न बनविताना पाहून आम्हाला अतिशय आनंद वाटला. त्यांना तो एक आशीर्वादच वाटतो. आज सर्व भगिनींचा आनंदाचा दिवस होता कारण त्यांना अचानक श्रीमाताजींनी त्यांना दर्शनासाठी बोलावले. सर्व भगिनींनी श्रीमाताजींना नमस्कार केला व त्यांना फुले अर्पण केली त्यावेळी श्रीमाताजींनी त्यांना 'अनंत आशीर्वाद' देत ती फुले कुठून आणली असे विचारले.

'तुम्ही खूपच छान जेवण बनविता मी तुम्ही बनविलेल्या जेवणाचा खूप आनंद घेत असते'असे श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतर सर्वजणांनी स्मितहास्य केले. 'त्यावेळी इथे कोण मराठी बोलले'असे श्रीमाताजींनी विचारल्यावर त्यातील काहीजण मराठीतून बोलले. त्यानंतर श्रीमाताजींनी विचारले की ,'तुम्ही सर्वजण कुठून आलात?'. त्यावेळी श्री पापाजी म्हणाले की, 'हे सर्वजण अंतरराष्ट्रीय समूहाचे सदस्य आहेत आणि हे सर्व तुझ्या प्रेमामुळेच शक्य आहे.' आमच्या भगिनी इटली, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आणि युक्रेनमधून आलेल्या आहेत. त्यावेळी श्रीमाताजींनी युक्रेन ऐवजी यु.के. असे ऐकल्यामुळे त्यांनी पुन्हा त्या शब्दाची चौकशी केली. नंतर त्यांना स्पष्ट केल्यानंतर श्रीमाताजींनी 'अच्छा युक्रेन' असे म्हणाल्या. त्यानंतर,'मी खूप चांगले अन्न खात आहे आभारी आहे, खरेच खूप आभारी आहे.'असे म्हणाल्या. त्यावेळी सर्वत्र पुन्हा एकदा आनंदी वातावरण तयार झाले. त्यांना खरोखरच माहीत नव्हते की श्रीमाताजी आम्हाला अशा प्रकारच्या काही क्षणांनी आशीर्वादीत करून अशा प्रकारचा आनंद देतील. सर्वजण त्या आनंदाच्या आठवणीत परत अपल्या सेवेला रुजू झाले.

● ● ●

# श्रीमाताजींच्या प्रेमळ सहवासातील आनंदी क्षण

दिनांक १ मे, २००७, इटली (ई मेल वृत्तांत)

आज श्रीमाताजींच्या चरणावर इटालीयन आणि अमेरिकन सहजयोग्याच्या ग्रुपने सुंदर फुलांचे दोन बुके सादर केले. त्यावेळी श्रीमाताजीचे आपल्या नेहमीच्या मोहक आनंदी हास्यासह सर्वांना दर्शन झाले. त्यावेळी श्रीमाताजींनी आज काही विशेष दिवस आहे का? तसेच आलेले सहजयोगी कोण आहेत याबाबत माहिती विचारली. त्यावेळी सर्वांनी सांगितले की आपल्याविषयी असलेले प्रेम व्यक्त करण्यासाठी सर्वजण आले आहेत.

त्यावेळी श्रीमाताजींनी पूर्वी इटलीमध्ये भेट दिलेल्या (कोमो)ठिकाणाचे फोटो सादर केले. सर्व फोटो श्रीमाताजींनी त्यांच्या कुटुंबासोबत व इतर सहजयोग्यांसोबत पाहिले. त्यावेळी श्रीमाताजी प्रत्येक फोटो अतिशय कुतुहलाने पहात फोटोतील प्रसंग ओळखत होत्या. त्यावेळी श्रीमाताजींनी फोटोंचे व फोटोग्राफरचे कौतुक केले.त्यावेळी फोटोग्राफरने नम्रपणे हे सर्व आपणच केले असल्याचे सांगितले.

त्यावेळी श्रीमाताजींनी सांगितले की, 'त्यांनी रात्रंदिवस प्रवास करून सर्वत्र काम केले आहे.त्या म्हणाल्या लोकांनी ज्या ज्या ठिकाणी त्यांना बोलावले त्या त्या ठिकाणी त्या गेल्या. इतक्या ठिकाणी गेल्या की त्यातील बरीच ठिकाणे त्यांना आता आठवत देखील नाहीत.सर्व धर्म एकच असल्याचा तसेच सर्व अवतार एकच असल्याचा संदेश दिला. हे लोकांना समजत नाही ते एकमेकांशी याबाबत भांडत रहातात.' त्यानंतर सर.सी.पी.म्हणाले की,' सर्व लोकांना एकत्र आणण्याचा हा एकमेव मार्ग आहे. तरी तुम्ही तिचा जागृतीचा संदेश ऐकणे आवश्यक आहे.' त्यानंतर श्रीमाताजींनी सांगितले की, 'या कार्यासाठी मी खूप प्रयत्न केले आहेत पण लोकांना या मार्गाविषयी ऐकायचेच नाही या मार्गात यायचे नाही.' त्यावेळी श्री पापाजींनी सर्व सहजयोग्याकडे हात करून श्रीमाताजींच्या निदर्शनात आणले की, 'बघ आता सर्वजण तुझे ऐकत आहेत.तुझा मार्ग स्विकारणारे जगभर आहेत.'

त्यावेळी श्रीमाताजींनी सांगितले की, 'सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, लोकांनी फक्त त्यांच्या स्वत:च्याच धर्माची पुस्तके वाचली आहेत. त्यानी कमीत कमी दोन इतर धर्माची पुस्तके वाचली तर त्यांना कळून येईल की सर्व धर्मामधे एकच सांगितलेले आहे . श्रीमाताजींनी सांगितले की हे आपण सर्व लोकांना सांगितले पाहिजे. याबाबत मला जे शक्य होते ते मी केले. त्यांनी सांगितले की सध्याची तरुण पिढी तुमच्यापेक्षा फार चांगली आहे. कारण ते हे सर्व मोकळ्यामनाने स्विकारतात.'

त्याचवेळी एकाने उपस्थित असलेल्या इटालियन युवाशक्तीबाबत ते खूप कार्य करीत असल्याचे सांगितले. त्यावेळी श्रीमाताजीनी हसून त्यांना आशीर्वादीत केले. त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींना नमस्कार केला. त्यावेळी श्रीमाताजी फुलांच्या बुकेकडे पाहून म्हणाल्या की,' बघा ही फुले विविध असून देखील एकत्र रहातात.' हे साधे पण गोड व सुंदर उदाहरण देऊन श्रीमाताजींनी सर्वांना एकत्र रहाण्याचा संदेश दिला असे सर्वांना वाटले.

श्रीमाताजी, श्रीपापाजी व सौ साधनादीदींच्या अतिशय प्रेमळ सहवासामुळे सर्वजण अतिशय आनंदी व सुखावून गेले होते.

● ● ●

# 'कबेल्यातील डोंगरदऱ्यांमध्ये श्रीमाताजींच्या सान्निध्यातील एक दिवस'

कबेला दिनांक २० मे २००७ (ई मेल वृत्तांत)

खरोखरीच हा जणू स्वर्ग आहे. हे वाक्य त्यादिवशी बाहेर फिरायला गेल्यावर श्रीमाताजींनी कबेल्याकडे परत येताना वारंवार उच्चारले. त्यांच्यासोबत असलेल्या सहजयोग्यांनी व्हिडीओच्या सहाय्याने त्या डोंगर दऱ्यांमधील परिसरापासून ते श्रीमाताजींच्या महालापर्यंतच्या श्रीमाताजींनी केलेल्या फेरफटक्याचे चित्रीकरण केले.

'कबेल्याच्या' भोवतालच्या परीसरातील 'नोव्हीच्या' मार्गावरील बोरबेरामधील निसर्गाची श्रीमाताजींनी खूप स्तुती केली. आजूबाजूची फुले, शेती, नद्या, श्रीमाताजींनी आम्हाला दाखविल्या. तसेच सुंदर हिरवळ, पर्वतही त्यांनी आम्हास दाखविले. त्यांच्याकडे आमचे लक्ष श्रीमाताजींनी वेधले.'पांढऱ्या रंगाचा पर्वत एखाद्या संगमरवरी खडकाच्या पर्वताप्रमाणे दिसत आहे.' असे श्रीमाताजी म्हणाल्या.आम्हाला एक गोष्ट जाणवली की श्रीमाताजींच्या आगमनामुळे डोंगर दऱ्या अधिकच हिरव्या झालेल्या आहेत.या ठिकाणीचे अशा प्रकारचे सुंदर निसर्गसौंदर्य पाहिल्यानंतर दुसऱ्या इतर ठिकाणांचा पुरेपूर आनंद घेणे खरच कठीण आहे असे श्री माताजी म्हणाल्या.

श्रीमाताजींनी काही भौगोलिक ठिकाणे, त्यांची नावे, वैशिष्टये आणि त्यांचे अर्थ विचारले (ज्यामुळे कधी कधी आम्ही अडचणीत येतो.) त्यांनी आम्हाला ही गोष्ट दर्शवून दिली की बरीच इटालियन नावे आणि भारतीय नावे यामध्ये साम्य आहे.क्वचित त्याच्या अर्थामध्ये भिन्नता असू शकते. (उदा. 'सेराव्हॅली आणि 'शेरावाली '(की ज्याचा अर्थ वाघावर बसलेली दुर्गादेवी ) याशिवाय काही इटालियन कॉर्नर्स हे भारतीय कॉर्नर्सप्रमाणे दिसतात.श्रीमाताजींनी इटालियन सुव्यवस्थित रस्त्याचे तसेच तेथील शानसव्यवस्थेचे कौतुक केले कारण तेथील शासन हे आपले रहिवासी लोक त्यांच्यासाठीच्या सुविधा, रस्ते यासारख्या गोष्टींची काळजी घेते. शिवाय येथील सामाजिक सुरक्षापद्धतीही प्रत्येकासाठी काही मोफत सुविधा मिळवून देण्यासाठीची हमी देते. त्यानंतर श्रीमाताजींनी येथील निवडणूकांबद्दल आणि भ्रष्टाचाराबद्दल त्या बोलल्या की, भष्ट्राचार हा भारताच्या प्रगतीमध्ये मोठा अडथळा आहे.त्यानंतर रस्त्यामध्ये श्रीमाताजी सभोवतालच्या निसर्गाकडे पुन्हा पुन्हा वळून पाहत होत्या आणि चेष्टा, विनोद करून संपूर्ण रस्ताभर हसून या सर्वांचा आनंद घेत होत्या.

श्रीमाताजी सभोवतालचा परिसर पाहून इतक्या आनंदी झालेल्या पाहून तसेच त्यांनी आनंदाने केलेल्या कौतुकामुळे, त्यांच्या आनंदामुळे आम्ही सर्वजणही आनंदाच्या सागरात डुंबून गेलेलो होतो.'नौव्हीमध्ये 'आजूबाजूचे काही लोक आपापल्या कामांमध्ये व्यस्त दिसत होते. त्यांच्याकडे पहात असताना श्रीमाताजीं म्हणाल्या की, 'तुम्ही पाहतच आहात की तुमच्यामध्ये आणि माझ्यामध्ये इतकाच फरक आहे की मी कधीच कोणत्याही गोष्टींची काळजी करीत नाही.'

श्रीमाताजी झाडे पहात होत्या. त्यानंतर त्यांनी डेझी नावाचे फूल पाहिले व त्या म्हणाल्या की 'ते ही माझेच एक नाव आहे' आणि त्या फुलाचा सुवास घेण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. 'येथील लोक फुलांवर फार प्रेम करतात' त्यांनी ही गोष्ट दाखवून दिली की इटलीचे सौदर्य हे येथील निसर्ग सौंदर्यामुळेच नव्हे तर येथील लोकांमुळेही अहे. कारण येथील लोक कमी आक्रमक आहेत आणि त्यामुळेच मला त्यांच्याकडून तरी आशा वाटतात.'असे श्रीमाताजी म्हणाल्या.

त्यावाटेने येताना आम्ही श्रीमाताजींना एक जमीन दाखविली. त्या जमिनीला त्या ठिकाणी श्रीमाताजींनी आशीर्वादीत केले. श्रीमाताजींनी त्या भागामध्ये केलेल्या कार्याबद्दलही समाधान व्यक्त केले. हे आई तुझे शतशः आभार. खरोखर हा स्वर्गीय दिवस होता..

● ● ●

## श्रीमाताजींच्या महालामधील इटालीयन मदर्स डे

दिनांक ८ मे,२००७, इटली (ई मेल वृत्तांत)

दिनांक ८ मे हा इटालीमध्ये मदर्स डे म्हणून साजरा केला जातो. हा अशा प्रकारे सहस्रार पूजेच्या दिवसानंतरची आमच्या प्रेमळ, प्रिय, आईबद्दलच प्रेम व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीचा हा प्रिय जादूचा दिवस होता.

या दिवशी साधारण दोन - तीन वर्षाच्या लहान मुलांनी श्रीमाताजींना उत्स्फूर्तपणे श्रीगणेशगीते गात गात फुले अर्पण केली. तेव्हा त्या छोट्यांचा गोडपणा खरोखरच आमच्या हृदयाला स्पर्श करून गेला. त्यानंतर त्यापेक्षा मोठ्या मुलांनाही काही फुले व भेटवस्तू अर्पण करण्याची संधी मिळाली.

त्यावेळी श्रीमाताजींना सन २००७-२००८ चे आमच्या आईची सुंदर छायाचित्रे असणारे कॅलेंडर भेट देण्यात आले. श्रीमाताजीं प्रत्येक छायाचित्र अतिशय लक्षपूर्वक न्याहळत न्याहळत पहात होत्या. त्यानंतर आम्ही श्रीमाताजींना नमस्कार केला. श्रीमाताजींनी सर्वांना आशीर्वादीत केले.

●●●

## आई सोबतची एक अविस्मरणीय खरेदीसहल

१२ मे, २००७ ,इटली (ई मेल वृत्तांत)

हा अत्यंत आनंदपूर्ण दिवस श्री माताजी आणि सर सी.पी.यांच्या सेरेव्हेले स्क्रीव्हीया मधील शहराबाहेरील दुकानातील भेटीमुळे उल्लेखनीय ठरला. त्या बोरबेरामधील फेरफटक्यादरम्यान असे वाटत होते की - निसर्गमाताच जणू काही हिरवळीमध्ये व सोनेरी प्रकाशामध्ये विराजमान झालेली आहे-

सहलीमध्ये भारतीय शास्त्रीय संगीताचा आनंद घेत घेत सभोवतालच्या निसर्गरम्य दृश्यामुळे श्रीमाताजी आनंदीत झाल्या. आमच्या सेरेव्हेलामधील आगमनादरम्यान असे वाटत होते की-वाराही जणू की त्यांच्या चेहऱ्याला स्पर्शून स्वत:चे कोडकौतुक पुरवून घेत होता-

श्रीमाताजींनी स्वत: निवडलेल्या दुकानांना भेटी देऊन खरेदीचा सर्वांनी आनंद घेतला. जेव्हा आम्ही त्यांच्या महालामध्ये गेलो आणि त्यांनी आम्हाला मदर्स डे दिवशीच्या समारंभासाठी काही शाली भेट देण्यासाठीची संधी दिली तेव्हा आम्ही इटालियन सहजयोगी खऱ्या अर्थाने विशेष आशीर्वादीत झालो.

ती अत्यंत उत्कृष्ट सायंकाळ होती जेव्हा आम्ही त्यांच्या कबेल्यामधील महालाच्या दिशेने शांतपणे आणि आनंददायक वातावरणात कारमधून पोहोचलो.

त्यांच्या आगमनाच्या वेळी त्यांच्या स्वागतासाठी आतुर झालेल्या सर्व सहजयोगींना आणि लहान मुलांना पाहून श्रीमाताजी अतिशय आनंदी झाल्या.

मदर्स डे दिवशी आम्हाला आशीर्वादीत केल्याबद्दल हे आई तुझे पुनश्च आभार

●●●

## श्रीमाताजींच्या सहवासात युवाशक्ती

### २८ मे, २००७ इटली (ई मेल वृत्तांत)

सर्व युवाशक्तीच्या वतीने स्वीज मधील युवाशक्ती मुलांना श्रीमाताजींच्या दर्शनाचा व सहवासाचा आनंद मिळाला. मुलांनी त्यांच्यासोबत सुंदर लाल व पांढच्या रंगाची गुलाबांची फुले आणली होती. सर्व मुलांना श्रीमाताजींच्या कॅसेलमध्ये दर्शनाचा आनंद मिळाला.

ज्यावेळी सर्वमुले श्रीमाताजींच्या समोर गेली त्यावेळी श्रीमाताजी अतिशय आनंदात व हसत हसत म्हणाल्या की, 'आज येण्याचे कोणते विशेष कारण आहे ?' त्या वेळी एका युवाशक्ती मुलाने सांगितले की आज, 'Pentecost Day 'आहे. त्यावेळी श्रीमाताजींनी फुलांकडे पाहिले आणि त्यांचा स्वीकार केला. त्यावेळी श्रीमाताजींनी विचारले की,' सर्व मुले इटालियन आहेत का?' तसेच फुलांकडे पाहून म्हणाल्या की,'ही कोणत्या प्रकारची फुले आहेत?'

त्यावेळी श्री संजय यांनी सांगितले की, 'ही सर्व युवाशक्ती मुले सध्या त्यांच्या देशात मोठ्या प्रमाणात सहजयोगाचे सार्वजनिक प्रोग्राम करीत आहेत त्याची माहिती देण्यासाठी ते आले आहेत.' श्रीमाताजींनी विचारले की,'आपल्यापैकी कोण प्रोग्राम घेता?'त्यावेळी एका युवाशक्ती मुलाने सांगितले की, 'युवाशक्तीच्या ग्रुपमधील सर्वजण रोटेशन पद्धतीने घेतो.' त्यावेळी श्रीमाताजींनी विचारले की, 'तुम्ही प्रोग्रॅममध्ये माहिती सांगता का?' मुले म्हणाली,' हो श्री माताजी, आम्ही सर्वजण माहिती सांगतो.' त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या, 'Very Good' त्यावेळी दिनांक १६ ते २७ जुलै मध्ये इटलीमध्ये होणाऱ्या युवाशक्तीच्या सेमिनारची माहिती एका युवाशक्ती मुलाने सांगितली.ताबडतोब श्रीमाताजी म्हणाल्या,'Very Good'. नंतर म्हणाल्या, 'सध्याचे बाहेरचे वातावरण चांगले नाही. तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार देऊन वाचवू शकाल. हे फार महत्त्वाचे काम आहे.'

त्याचवेळी कल्पनादीदीचा फोन आला. तो फोन सर.सी.पी.नी घेतला.त्यानंतर श्रीमाताजी हसत म्हणाल्या की, 'माझी मुलगी कल्पनाचा फोन होता.' त्यावेळी सर.सी.पी.म्हंणाले की,'ही सर्व तुमचीच मुले आहेत.' त्यावेळी श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले. त्यावेळी प्रत्येक युवाशक्तीच्या मुलाने श्रीमाताजींना लाल रंगाचे सुंदर वास असलेले गुलाबाचे फूल अर्पण केले. त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या की, 'ही फुले भारतातील फुलांसारखी वासाची फुले आहेत.' एका युवाशक्ती मुलाने सांगितले की, 'त्याच्या स्वत:च्या बागेतील ती फुले आहेत.' त्यावेळी श्रीमाताजींनी फुलांचा परत एकदा वास घेतला आणि सर्वांना अनंत आशीर्वाद दिले. यावेळी श्रीमाताजी. म्हणाल्या की, 'युवाशक्ती अतिशय उत्कृष्ट आहेत कारण ते निरागस आहेत. ते अतिशय चांगले आहेत. त्यानंतर त्यांनी सर्व मुलांच्या खाण्याच्या व रहाण्याच्या व्यवस्थेकडे लक्ष देण्यास सांगितले.

● ● ●

# आमच्या प्रिय आईसोबत घालविलेले काही सुंदर क्षण

२४ एप्रिल २००७, इटली (ई मेल वृत्तांत)

कबेलामध्ये अशाच एका सुंदर दिवसाची सुरवात झाली. सकाळीच ऑस्ट्रेलियन सहजयोगिनींनी श्रीमाताजींना साडी व सुंदर फुले भेट म्हणून दिली. त्यावेळी श्रीमाताजी अतिशय प्रसन्न वाटत होत्या त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांना श्रीमाताजींची अमृतवाणी ऐकण्याची संधी मिळाली. श्रीमाताजींनी इटालियन सहजयोग्यांबद्दल बोलताना सांगितले की, ते अतिशय साध्या मनाचे आणि अतिशय सखोल सहजयोगी आहेत. त्याचा आपण आदर्श घ्यायला हवा. त्यांना आपण मदत करायला हवी. त्यानंतर श्रीमाताजी कबेल्याचा अर्थ सांगण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की कबेला म्हणजे 'कासा -बेला' म्हणजे सुंदर घर (पॅलाझो डोरिआ) व त्यामुळेच त्याला कबेला असे म्हणतात. तसेच त्यांनी सांगितले की, इटालियन सहजयोग्यांनी त्यांच्या महालाचे नुतनीकरण करण्यासाठी खूप मदत केली.

त्यानंतर आईने आम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद दिले. सर्वजण स्मितहास्याच्या झलकेने आणि अतिशय आनंदाने, शांतीपूर्वक उत्साहपूर्वक त्या ठिकाणाहून निघाले.

त्यानंतर काही वेळाने श्रीमाताजी, श्रीपापाजी व सौ साधनादीदी बाहेर निघाल्या. त्यावेळी त्यांची कार प्लाझा वरुन कबेलाकडे निघाली त्यावेळी तेथील सर्व सहजयोगींनी श्रीमाताजींचे दर्शन घेतले. प्रवासामध्ये श्रीमाताजी इटालीयन तसेच कबेल्याबद्दल बोलत होत्या. महालामध्ये परत येताना श्रीमाताजींनी कार थांबवून सर्व सहजयोग्यांना दर्शन दिले. त्यावेळी श्रीमाताजी अतिशय प्रसन्न व सुंदर दिसत होत्या. श्रीमाताजी प्रेमळपणे म्हणाल्या की,'तुम्ही सर्वजण मला पाहण्यासाठी आलेला आहात? मी तुमच्या सर्वांची अत्यंत आभारी आहे.'

आदिशक्तीचे इतके प्रेमळ दर्शन व अमृतासमान वाणी ऐकायला मिळाल्यामुळे उपस्थित असलेले सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते.

● ● ●

# सहस्रार पूजा

६ मे २००७,इटली (ई मेल वृत्तांत)

आदल्या दिवशी सर्वजण पेंडॉलमध्ये जमले होते. त्यावेळी सुरवातीला सहजयोग्यांचे कार्यक्रम सादर झाले. त्यानंतर प्रसिद्ध भारतीय सरोदवादक उस्ताद वजाहत खान यांचा कार्यक्रम झाला. त्यावेळी त्यांनी संध्याकाळच्या रागावर आधारित त्यांचे विशेष कौशल्य वापरून कार्यक्रम सादर केला. त्यावेळी उपस्थित असलेले सर्वजण निर्विचारतेचा आनंद घेत आईच्या कुशीत गेले.शेवटी त्यांनी राग भैरव सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. श्रीमाताजींनी भारतीय शास्त्रीय संगीताची ओळख करून दिल्याबद्दल सर्वजण अतिशय आनंदी झाले.

पूजेच्या दिवशी श्रीमाताजींच्या पूजेची व्ही.डी.ओ. टेप त्वरित सगळ्यांना पहायला मिळाल्यामुळे सर्वजण अतिशय आनंदी झाले होते. - जय श्री माताजी

● ● ●

## लहान मुलांसोबतचा कार्यक्रम

२९ एप्रिल, २००७, इटली (ई मेल वृत्तांत)

साधनादीदींच्या उपस्थितीत आणि श्रीमाताजींच्या येण्याच्या शक्यतेमुळे बालगोपाळांच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा आनंद मिळाला. सर्वजण दुपारपासूनच पॅलेसच्या 'पीआझामध्ये' जमले होते. सर्व वयाचे सहजयोगी दुपारपासूनच बसून होते. त्यानंतर सौ साधाना दिर्दीचे आगमन झाले. त्यांच्या समोर श्रीमाताजींची अनेक भजने सादर केली गेली.

अतिशय लांबचा प्रवास करून आलेल्या ऑस्ट्रेलियन सहजयोग्यांच्या उपस्थितीमुळे आणखी उत्साहमय वातावरण झाले. तसेच युवाशक्ती मुले देखील कार्यक्रमात सहभागी झाली. त्यानंतर सीयुरी..सीयुरी आणि सोले माओ सारख्या भजनाने आमची हृदये आनंदाने भरून आली. त्यानंतर दोन सहजयोगी मुलींनी गणेश आरतीवर सुंदर नृत्य केले.

शेवटी साधनादीदींनी सर्वांचे कौतुक केले.आणि सर्वांचे आभार मानले.

● ● ●

## एकत्र कुटुंबामधील आनंद - कल्पनादीदी सोबतचा दिवस

दिनांक ७ जून २००७,इटली (ई मेल वृत्तांत)

तो संपूर्ण दिवस अवर्णनीय अशा प्रेमाने भरून गेलेला होता. जे प्रेम कल्पनादीदींच्या निरोपसमारंभासाठी बनविलेल्या केकमधून व भेटवस्तूमधून आम्ही व्यक्त करू शकत नव्हतो. कारण कल्पनादीदीनी आम्हा सर्वांना मागील चार दिवसांमध्ये खूप प्रेम व आनंद दिला. त्या प्रेमाचा सुगंध संपूर्ण वातावरणात होता. तो सुगंध महालातील प्रत्येक बाजूंनी येत होता. कदाचित तो श्रीमाताजींच्याच खोल्यांमधून येत असावा. परंतु तो सुगंध प्रत्येक छोट्या छोट्या वळणांमधून येत होता आणि आमच्या हृदयामध्ये प्रवेश करीत होता . तसेच सहजयोग्यांच्या प्रत्येक वर्तणुकीतून तो प्रेमाचा सुगंध दरवळत होता. तो दिवस फारच सुंदर होता. त्यावेळी श्रीमाताजींनी व कल्पनादीदींनी सर्व सहजयोग्यांना भेट वस्तू वाटल्या त्यावेळी सर्व जग एकच कुटुंब असल्याचे वाटत होते.

सलग चौथ्या दिवशीही अगदी श्रीमाताजीं प्रमाणेच कल्पनादीदीही तेथील महिलांना ५० लोकांसाठीचे जेवण कसे बनवायचे याचे मार्गदर्शन करीत होत्या. कल्पनादीदींनी त्यासर्वांना कोणत्या प्रकारचे मसाले विकत घ्यायचे कशा प्रकारे चवीमध्ये समतोल ठेवायचा आणि कोणत्या जेवणामध्ये कोणकोणत्या महत्त्वाच्या गोष्टी असतात हे सांगितले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खाणाऱ्याला समाधानी करण्यासाठी कोणत्या भावनेने ते बनविले पाहिजे हे त्यांनी सर्वांना सांगितले.

कल्पनादीदींच्या अन्न बनविण्याच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित असलेल्या महिला भूतकाळामध्ये श्रीमाताजींनी त्यांना वैयक्तिकरित्या शिकविलेल्या अन्न बनविण्याच्या आठवणीत गेल्या. त्यावेळी सर्व महिलांना श्रीमाताजींनी जेवण बनविण्यासाठी शिकविलेल्या शिस्त, काळजी, स्वच्छता, हळूवारपणा, प्रेम, आनंद या सर्व गोष्टींची आठवण झाली.

● ● ●

## श्रीमाताजींच्या सहवासातील न विसरणारा वाढदिवस समारंभ

१६ जून २००७, इटली, (ई मेल वृत्तांत)

आज दोन सहजयोग्यांचा वाढदिवस होता. श्रीमाताजींनी त्यांच्या सहवासात त्यांना आशीर्वादित करून साजरा केला.

श्रीमाताजींनी ज्यांचा वाढदिवस होता त्या सहजयोग्यांना त्यांच्या पत्नी आणि संपूर्ण कुटुंबाला भेटीला घेऊन येण्याचे निमंत्रण दिले होते. श्रीमाताजींनी त्यानां विचारले की आपण कुठले असून ते त्यांच्या जीवनात काय करीत आहेत.

त्यानंतर श्रीमाताजींना युएसए मध्ये तयार झालेले सहजयोगाची माहिती असलेले सहजयोगाच्या आत्मसाक्षात्काराचे पुस्तक अर्पण केले. तसेच शनिवारी संध्याकाळी कबेल्याजवळच्या नेव्ही लिजूरी या ठिकाणी झालेल्या पब्लिक प्रोग्रामविषयी माहिती दिली. जास्तीत जास्त लोकांना आत्मसाक्षात्कार देण्याच्या उदिष्टाबाबतची माहिती ऐकल्यावर श्रीमाताजी फार आनंदी झाल्या.

श्री पापाजीं पुस्तकाचे बारकाईने निरिक्षण करीत असताना म्हणाले की, सर्वात उच्च प्रेमाचे प्रगटीकरण म्हणजे ज्यावेळी येशुख्रिस्ताला सुळावर चढवण्यात येत होते त्यावेळी त्याने परमेश्वाकडे प्रार्थना केली की मला जे सुळावर चढवित आहेत त्यांना तू क्षमा कर. त्याप्रमाणे श्रीमाताजीं सर्वधर्म एक आहे हे एकमेव सत्य असल्याचे सातत्याने सांगत आल्या आहेत. श्रीपापाजींच्या प्रतिक्रियेकडे पाहून श्रीमाताजी प्रभावित झाल्या होत्या.

जय श्रीमाताजी.

● ● ●

## पक्के सहजयोगी आहात.

दिनांक १५ जून, २००७ इटली(ई मेल वृत्तांत)

आज श्रीमाताजींनी सुंदर फुलांचा स्वीकार करीत सर्व सहजयोग्यांना आणि इटालीयन लोकांना आशीर्वाद दिले. त्यावेळी शनिवारी नेव्ही लिजुरी येथे झालेल्या कल्चरबाबतच्या फंनफेअरचे माहितीपत्रक श्रीमाताजींना दाखविले. तसेच त्यांना सांगितले सदर कार्यक्रमात सहजयोग्यांनी भाग घेऊन त्यामध्ये भारतीय संगीत व नृत्याच्या आधारे भारतीय नकाशा सादर केला. या सर्वापाठिमागे सहजयोग्यांचा मुख्य उद्देश हा आत्मसाक्षात्कार देणे हाच होता. हे ऐकल्यावर श्रीमाताजी 'पक्के सहजयोगी आहेत' असे म्हणाल्या.

त्यानंतर स्थानिक वर्तमानपत्रात नुकत्याच दिनांक ९ व १० रोजी झालेल्या नवीन सहजयोग्यांच्या सेमिनारमध्ये भाग घेतलेल्या १३० लोकांबाबतची माहिती श्रीमाताजींच्या निदर्शनात आणली. त्यामुळे श्रीमाताजी अतिशय आनंदी झाल्या.

● ● ●

# Eternally Inspiring Recollections of our Holy Mother

या इंग्रजी पुस्तकात, सहजयोगी बंधू-भगिनींना प.पू.श्रीमाताजींविषयी जे काही दैवी अनुभव आले ते प्रसिद्ध केलेले आहेत. त्याच पुस्तकातून घेतलेले काही अनुभव

## The tremendous love for Shri Mataji

सन १९८६ मध्ये मी पहिल्यांदा भारत दौऱ्यावर काही इतर सहजयोग्यांसमवेत आलो होतो.त्यावेळी कॅनडासाठी खूप गिफ्टस वाटली गेली. मी स्टेजवर गेलो. श्रीमाताजी आपल्याकडे बघतील अशी खूप आशा वाटायची. पण बरोबर त्यावेळी श्रीमाताजी दुसरीकडेच पहायच्या. अनेक वेळा असे झाले. शेवटी मी श्रीमाताजींचे माझ्याकडे चित्त वेधून घेणे सोडून दिले.

त्याच कालावधीत, एका दुपारी श्रीमाताजींची पूजा आम्हाला मिळाली. त्यावेळी मला स्वत:ला हृदयापासून श्रीमाताजीं जवळून पाहण्याची, दर्शनाची इच्छा झाली. खरं तर माहीत होते की हे अशक्य आहे! तरी सुद्धा हृदयापासून अशी जबरदस्त इच्छा झाली. त्यानंतर मी उठलो व पूजेनंतर श्रीमाताजी ज्या खोलीत बसल्या होत्या त्याच्या बाहेर, अंगणात कडेला ध्यान करत बसलो. खूप सहजयोगी आजूबाजूला जात होते. अंगणामध्ये आम्ही जेवण घेतले. परंतु श्रीमाताजींची ओढ आतूनच लागली होती. पूजेनंतरची ती ध्यानाची अवस्था चालूच होती, आणि अचानक श्रीमाताजी आम्ही दोघे जेथे बसलो होतो एकदम तेथे आल्या.आम्ही श्रीमाताजींना वंदन केले आणि लगेचच त्या आपल्या खोलीत परत गेल्या. सभोवार शेकडो सहजयोगी होते. परंतु कुणाला काही कळायच्या आतच हे घडले.

खरंच! जणू काही त्या आम्हाला यातून शिकवणच देत होत्या. जर आपल्याला हृदयापासून श्रीमाताजींबद्दल प्रेम वाटले तर त्या सतत आपल्या बरोबरच असतात आणि खरोखरी ते प्रेमच श्रीमाताजींना आपल्याकडे घेऊन येते!

-Alan Morrissey

## To me it was magic.

भारत दौऱ्याच्या (India Tour) मध्यावर असताना, आम्ही महाराष्ट्रातील एका खेड्यात होतो. प्राचीन खेडे असावे. तेथे मिरवणूक आयोजित केली होती. श्रीमाताजी बैलगाडीतून येणार होत्या. जवळ जवळ एक तासभर आम्ही सर्वजण उन्हामध्ये होतो.थोड्याच वेळात श्रीमाताजी बैलगाडीतून आल्या. बरोबर काही म्युझिशियन्स पण होते. आम्ही सर्वजण तेथून मुख्य पेंडॉलकडे गेलो. तेथे श्रीमाताजी व गाणारी मंडळी स्टेजवर होती. वरून छोटासा मांडव असल्यासारखे होते. परंतु त्या सावलीत आम्ही सर्व मावत नव्हतो. या गोष्टीकडे श्रीमाताजींचे लक्ष होते.

त्यावेळी आकाश एकदम स्वच्छ असून रणरणते ऊन होते. आम्ही एका उंच पठारावर होतो. जेथून आम्ही मैलभराच्या परिसरातील पाहू शकत होतो. श्रीमाताजींनी आम्हाला उन्हामध्ये असल्याचे पाहिले व त्या वर आकाशात पाहू लागल्या. नंतर परत एकदा आम्हा सर्वांवर दृष्टी व परत आकाशाकडे नजर असे एकदोनदा केले अन् काय आश्चर्य ! आकाशात जेथे श्रीमाताजी पहात होत्या, तेथे एक ढग येऊ लागला व तो काही क्षणांतच पसरू लागला. त्यांची दृष्टी तेथे स्थिर होती व काही मिनिटांतच आकाश संपूर्णपणे त्या ढगांनी व्यापून गेले.अक्षरश: श्रीमाताजींनी आम्हा सर्वांचे उन्हापासून खरोखरीच संरक्षण केले.

– Claire Nesdale

२४ एप्रिल २००७









१० जून २००७









१२ मे २००७





## इटालीयन मदर डे, ८ मे





## फ्रेंच मदर डे, ३ जून





## श्रीमाताजी मुंलाच्या सहवासात, २० मे





१३ मे २००७













When I came here as Shri Sita

१९८४ मध्ये आमचे बोर्डी येथे लग्न झाले. लग्नानंतर लगेचच वैतरणा,शहरी आणि जवळपासच्या २-३ खेड्यामध्ये आम्ही सर्व सहजयोगी दौऱ्यावर होतो. वैतरणाला पोहोचल्यावर त्या रात्री हवन होते. नवीन लग्न झालेल्या जोडप्यांना ते हवन करायला मिळाले. त्या रात्री श्रीमाताजींनी मला त्यांच्या खोलीत बोलावले व रात्रभर त्यांच्या चरणकमलांतून येणाऱ्या परमचैतन्याचा लाभ झाला. तो अनुभव अतिशय आश्चर्यकारक होता. त्या निद्रिस्त होत्या.

पण खरंतर तसं नव्हतं. असं वाटत होतं की जणू काही त्या एकीकडे कार्यरत आहेत.सकाळी उठल्यावर श्रीमाताजींच्या खोलीलगत असलेल्या बाल्कनीमध्ये आम्ही उभे राहिलो. सभोवार सर्वत्र गर्द झाडी होती व ती जागा त्या न्याहाळत होत्या. तेथे त्यांनी सांगितले की येथेच ती सीता न्हाणी होती. जेव्हा मी सीतेच्या रूपात या परिसरात आले होते, तेव्हां मी येथेच राहिले.

येथे एक नदी होती. अतिशय स्वच्छ! तेथून एक वाट होती! त्या असे वर्णन करत होत्या जणू काही ते सर्व त्यांच्या डोळ्यासमोर येत होते. सीता न्हाणी ही एक अशी जागा, असे स्थान होते, की तेथे श्रीसीतामाई स्वतंत्रपणे स्नानास यायच्या.त्या परिसरात त्या प्रभु श्री रामचंद्र व श्री लक्ष्मणासोबत तेथे होत्या. त्या सर्व परिसराचे त्या वर्णन करत होत्या. ज्यावेळेस मी येथे होते. त्यापेक्षा येथे आता बराच बदल झाला आहे.

– Prerna Richards.

My heart was like the Sun.

१९८०च्या घरातील तो माझा पहिला भारत दौरा असेल. मला सहजयोगात येऊन वर्ष झाले होते. त्यावेळी माझी स्थिती तशी खराब होती. आणि माझ्या मध्य हृदयावर जबरदस्त दुखणे वाटत होते. वैतरणा येथे मिरवणूक होती. परंतु मी अजिबात त्या मनस्थितीत नव्हते. प्रत्येक जण आनंदाने नाचत होता. एकीकडे संगीत चालू होते. प्रत्यक्ष श्रीमाताजी बैलगाडीत बसलेल्या होत्या.

मी एका कडेने चालत होते. एकीकडे श्रीमाताजींची मनात क्षमा मागत होते, मला छातीत दुखत असल्याने मी नाचू शकत नव्हते, म्हणून मी एकीकडे श्रीमाताजींची क्षमा मागत होते. नंतर आम्ही एका खेड्यात गेलो. तेथे श्रीमाताजींचा कार्यक्रम होता. श्रीमाताजी आत्मसाक्षात्कार देत होत्या आणि आम्ही प्रत्येकजण जाऊन त्यांना नमस्कार करत होतो. सर्वात शेवटी, जेव्हा मी नमस्कार केला, तेव्हां त्यानी माझ्या मध्य हृदयावर हात ठेवला.

त्या म्हणल्या Good आणि त्याक्षणी माझे हृदय खुलले गेले, इतके की तेव्हांसारखे मला कधीच वाटले नव्हते. तो अनुभव इतका प्रचंड होता की जणू काही माझे हृदय हे एक सूर्य बनून एका किलोमीटर पर्यत चमकत होते.

खरच श्रीमाताजींच जाणत होत्या, की माझी स्थिती काय आहे आणि मला काय आवश्यक होते!

– Trupta de Graaf

The highest of heights is the heart of her disciple

१९८८ च्या भारत दौऱ्यावर असताना कृष्णा नदीच्या तीरावर श्रीमाताजींच्या अमृतवाणीचा लाभ झाला. नंतर सर्वात शेवटी,त्या आम्हाला असे म्हणाल्या की, देवी हिमालयवर वास करते. ती तेथे वास करते कारण तिला उच्च निवासस्थान खूप पसंत आहे. आणि तिच्यासाठी सर्वात आधिकाधिक उच्चतम निवासस्थान म्हणजे तिच्या भक्तांचे हृदय होय !

– Gwenael Verez

# तत्वज्ञानाचा संदेश

संदर्भ :- परा आधुनिक युग-प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी

असे अनेक प्रश्न आहेत की ज्याला शास्त्रात उत्तरे नाहीत. वैद्यकिय शास्त्र सध्या गुणसूत्र नावाच्या अत्यंत सूक्ष्म अशा गोष्टीच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहे. पण ह्याबाबतीत शास्त्रज्ञ अत्यंत निराश झाले आहेत. कारण ह्या गुणसूत्राच्या मदतीने पुढे कुठलीच शोधात प्रगती होत नाही. आणि आधुनिक युगातल्या जीवनशैलीने जो गुंता करून ठेवला आहे तो सुटता सुटत नाही.

गुणसूत्रे ही अनुवंशिक आहेत. ह्या भ्रमापर्यंत ते पोहचले आहेत आणि तो अगदी चुकीचा आहे. खरे पहाता गुणसूत्राचे प्रतिबिंब आमच्या व्यक्तिमत्वात अगदी रोजच्या जीवनात देखील पडलेले आपल्याला जाणवते. आपल्या सर्व भावनिक वागण्यावर ह्या गुणसूत्रांचाच प्रभाव असतो.

आईच्या उदरात ज्यावेळेस एखादे बालक गर्भ म्हणून प्रवेश करते त्यावेळेस शरीरात कुठलीही बाहेरची गोष्ट शिरली तर ती बाहेर फेकून द्यायची हा शरीराचा निसर्गधर्म असूनही शरीर तो गर्भ बाहेर फेकत नाही, उलट ह्या गर्भाचे ते अत्यंत निगराणीने तो विकसीत जीव तयार होईपर्यंत संरक्षण करते. ते बाळ जेव्हा संपूर्ण तयार होते तेव्हाच स्त्रीला बाळंत वेदना सुरू होतात. आणि मग ते आईच्या उदरातून बाहेर येते.हे कसे? हे वेळापत्रक कोण बनवतो? आणखीनही असे अनेक प्रश्न आहेत की ज्यांची उत्तरे शास्त्राच्या आधारे मिळू शकत नाहीत. शास्त्राचे देणे घेणे हे फक्त वस्तुस्थितीशी अथवा मानवी शरीराशी असते. आधुनिक जीवनातल्या इतर अनेक अडचणींचे निराकारण ते करू शकत नाही. मानवी जीवनातल्या सूक्ष्म किंवा गुंतागुंती समस्यांचा शोधही ते लावू शकत नाही. मुळात मानवी उत्क्रांतीच, आणि एकूणच मानवी आयुष्याचा हेतू काय? आधुनिक युगाच्या गुंत्यातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता?जे आधुनिक युग अत्यंत गोंधळलेल्या अवस्थेत आणि हिंसक बनले आहे! विश्वात संपूर्ण शांती निर्माण करण्याचा मार्ग कोणता? असे अनेक प्रश्न विचारले जाऊ शकतात. पण ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांनादेखील शास्त्राकडे उत्तरे नाही.अर्थात आता आपणास हे माहीत झाले आहे की ही सर्व उत्तरे भौतिक जगतात नाही तर आपल्यातच सापडणार आहेत.

सूक्ष्म, सखोल विचार केला तर ह्या सर्वांच्या मागे उत्तमप्रकारे यंत्रणा असते. रिमोट कंट्रोलच्या आधारे पाठीच्या कण्यातून ती कार्यरत असते. त्याच्या ७ साखळ्या असतात. धर्म ग्रंथात ह्याला (SOUL)असे संबोधिले आहे. हा आत्माच आपल्या चांगल्या वागणुकीवर व रिंगसतेवर अंकुश ठेवून असतो. योग्यता आणि चांगुलपणा ह्याचे संरक्षणही हाच आत्मा करीत असतो. आपल्याला सर्वनाशापासून वाचविणारा हा आत्माच असतो. आणि हाच आत्मा पेशीच्या आधाराद्वारे पेशींमधले वातावरण व्यवस्थित ठेवण्यात गुंतलेला असतो. जेव्हा व्यक्तीच्या चुकीच्या वर्तनाद्वारे ह्या आत्म्याला आव्हान दिले जाते तेव्हा त्याचा परिणाम पेशींच्या आधारावर होतो.

आपण जर संधीचा फायदा विचारात घेतला तर उत्क्रांतीमध्ये -माणूस-ह्या पातळीवर येण्यास फारच थोडा वेळ लागला आहे असे लक्षात येईल.ह्या उत्क्रांतीची कल्पना अनेकमजली, अनेकस्तरीय अवकाशयानाच्या कॅपसूलशी करता येते. ज्यावेळेस हे यांन सगळ्या आतल्या रचनेसह जमिनीवरून उड्डाण करते. अत्यंत वेगाने ते उडते. थोड्या वेळाने त्यात स्फोट घडत जातात. वेगात भर पडत जाते. जळलेले भाग मागे टाकत अवकाशयान पुढेजातच रहाते. अगदी ह्याच पद्धतीने उत्क्रांतीने माणसाने ह्या पातळी पर्यंतचा प्रवास केलेला आहे. पहिली शारीरीक पातळी, नंतर मानसिक भावनिक पातळी, आध्यात्मिक पातळी माणसामध्ये जागृती आणण्यास मदत करते. हे आता लोकांच्या लक्षात आले आहे आणि आध्यात्मिक शोध सुरू झाला आहे ह्या सर्व सुधारणा शेवटी मानवी मनाच्या आत होत असतात.

स्वत:च्या शोधाच्या ह्या ६ जाणीवा सहजयोगाद्वारे सहज मिळवता येतात. कारण तेथे आम्ही आत्म्याबद्दल खूप जागृत असतो. आम्ही स्वत:बद्दलचे हे ज्ञान कुंडलिनीद्वारे मिळवतो आणि तिथून परमेश्वराचा प्रवास सुरू होतो. कारण स्वत:ला जाणून घेतल्याखेरीज परमेश्वराच्या अस्तित्वाचा शोध लागणे कठीणच आहे.

खरी गोष्ट अशी आहे मानवी शरीरातल्या माकडहाडापाशी व्यक्त न झालेली सुप्तावस्थेत असलेली शक्ती असते तिलाच कुंडलिनी म्हणतात. उत्क्रांतीच्या जडण घडणीची ती एक सुप्त आंतरशक्ती आहे. अस्ताव्यस्त झालेल्या जीन्सना (पेशींना) योग्य जागी आणणे आणि त्याचे संगोपन करणे ही ताकद तिच्याठायी असते. मग ते मिळवलेले असो अथवा अनुवंशिक असो. जेव्हा जी जागृत होते तेव्हा ती ह्या जीन्सची रचना बदलून टाकते. ती फक्त ही रचनाच बदलत असते. नव्हे तर ती माकडहाडापासून बाहेर पडते आणि शोधकांचा सर्वशक्तीमान अशा दैवी प्रेमाशी संबंध जोडते. तिला (Holy Ghost ची) शीतल लहर, रुथ, ऋतंभरा,किव्हा परमचैतन्य ह्या नावानीही संबोधले जाते. म्हणजे बाप्तीस्मा झाल्यावर माणसाला जसे वास्तवज्ञान झाले पाहिजे. तसे माणसाच्या ह्या दुसऱ्या जन्मानंतर तो मुक्तात्मा बनतो. साहजिकच सर्व शक्तिमान परमेश्वराचे प्रतिबिंब असणाऱ्या आत्म्याच्या दिव्य प्रकाशाचा आपल्या जाणीवेत प्रवेश होतो आणि आपले जीवन झगमगून उठते. खऱ्या अर्थाने साधकाचा पुर्नजन्म होतो त्याच्यात अमुलाग्र बदल होतो. जणू त्याने आपल्या चेहऱ्यावर एखादा दुसरा मुखवटाच चढवावा! खरोखर सर्वसामान्य साधक आणि मुक्तात्मा योगी ह्या दोघांमध्ये अगदी जमीन आस्मानाचा फरक आहे.

तो स्वत:च स्वत:चा गुरू बनतो. दैवी प्रेमाचा संपूर्ण अंगीकार करतो. एखाद्या अंड्याचे सुंदर पक्षात रुपांतर व्हावे. तशीच जणू ही पुनरुद्धाराची पद्धत असते. मला अंड्याचेच उदाहरण का आठवले ते एक प्रतीक असावे. ज्यायोगे एखाद्याला आपल्या पुनरुद्धाराची आठवण व्हावी. जीन्स (पेशी) बदतात आणि त्याची जागा दुसराच मुखवटा घेतो. संपूर्ण बदल! जी माणसे आजारी असतात किंवा अहंकारी असतात त्यांच्यात हा बदल होण्यास वेळ लागतो. आणखीन ज्याच्या मनात अपराधीपणाची भावना असते किंवा जे दुसऱ्याना क्षमा करू शकत नाहीत त्यांनाही आपल्या स्वत:च्या उद्धारात काही अडचणी निर्माण होऊ शकतात. भोंदू साधूकडून किंवा चित्रविचित्र, कर्मठ लोकांकडून जर त्यांना काही अडचणी आल्या तरीही वेळ लागू शकतो. तरीही ते सहजयोगामध्ये सहजतेने होऊ शकतात. काही लोकांनी एका रात्रीत मादक पदार्थांच्या आपल्या सवयी सोडल्या आहेत. त्यांच्यात एकाएकी व्यसन सोडल्यामुळे होणाऱ्या त्रासाचा मागमूसही आढळत नाही.

कुंडलिनी जागृत करून स्वमुक्ती करणे ह्याचा खूप चांगला परिणाम नेहमीच दिसून येतो. ही जागृत कुंडलिनी एक नवीनच रचनात्मक शक्ती निर्माण करते. त्यातले कांही कवी बनले, काही संगीतकार बनले आणि काही कलाकार. त्या सर्वांनी त्या त्या क्षेत्रातली उच्चतम बुद्धिमत्ताही मिळवली. लोकांचे आर्थिक प्रश्न सोडवले जातात. भावनिक आजार बरे होतात. अगदी कॅन्सरसारखे दुर्धर रोगही नाहीसे होतात. इतरही अनेक दुर्धर रोग कुठल्याही तऱ्हेचे औषधोपचार न करता बरे होतात. साधक जीवननाट्याचा साक्षीदार बनतो. एक प्रकारची आंतरिक शांतता मिळवतो. तो सर्व धर्माचा आदर करतो आणि विश्वातल्या सर्व धर्मांना व्यापून उरलेल्या विश्वधर्माचा तो असतो. त्याच्यात नैतिकता ही महत्त्वाची आणि उत्स्फूर्त भाग बनून जाते त्याच्यात असे संपूर्ण परिवर्तन झाल्यावर कोणतीही अनैतिक गोष्ट करण्यास तो नाखूष असतो. अध्यात्माच्या दिव्य प्रकाशात त्याला काय योग्य काय अयोग्य, हे अगदी बरोबर दिसते. त्याच बरोबर तो अत्यंत स्वच्छ आणि पवित्र राहण्यास समर्थ बनतो. कारण त्याने जे जे काही विनाशक, विध्वंसक असते त्याचा त्याग केलेला असतो. तो त्याच्या आदरास कारणीभूत झालेल्या जीवनमूल्यांचा, सद्गुणांचा आनंद घेऊ शकतो आणि शेवटी तो संशयातीत असा सद्गुणी माणूस बनतो. म्हणजे प्रथम विचारहीन जागृती मिळवतो आणि नंतर

त्याच्यासाठीही संशयातीत जागृती निर्माण होते. ह्या ठिकाणी पोहचलेला सहजयोगी दुसऱ्यांना मुक्ती देऊ शकतो. त्याच्यावर वयाचा परिणाम दिसून येत नाही. उलटपक्षी सहजयोगी कमीत कमी २० वर्षांनी लहान दिसू लागतो. त्यांचे अस्तित्व विश्वात्मक बनते आणि लोभ, मोह,क्रोध,मत्सर मद, माया हे मानवाचे सर्व शत्रू दिसेनासे होतात आणि अर्थातच मग संताचा एक असा वंश तयार होतो की ज्यांना आपली तपश्चर्या किंवा विरागी वृत्ती दाखविण्यासाठी, कशाचाच त्याग करावा लागत नाही.

ज्या गोष्टींची, म्हणजे दैवी प्रेमाची, जे खरे अंतिम सत्य आहे,आपण कल्पनाही करू शकत नाही ती गोष्ट सहजयोगी हाताच्या बोटांनी अनभवू शकतात. होलीघोस्ट शीतल लहरीने उठवलेले सुखद तरंग.! हाताची बोटे ही शक्तिस्थानाशी, चक्रांशी संबधीत असतात. हीच चक्रे आपल्या शारीरिक, भावनिक, मानसिक घडामोडींना कारणीभूत ठरत असतात.जर हे योगी स्वत:ची चक्रे सुधारू शकतात. तर त्यांना दुसऱ्यांच्या चक्रांमध्ये सुधारणा करता यायला हवी, म्हणजे मग सर्वच शारीरिक, मानसिक, भावनिक अडचणी दूर होऊ शकतात. जे लोक शुद्ध चारित्र्याचे असतात त्यांच्यात, त्यांच्या नैतिक जीवनात आपोआपच हातभार लागू शकतो.

आता आपण प्रत्येक मानवी शरीरात अस्तित्वात असलेल्या एका सूक्ष्म प्रणालीचा विचार करणार आहोत. प्रत्येकाच्या शरीरात अस्तित्वात असलेल्या ह्या प्रणालीची उत्क्रांतीच्या प्रवासात चांगलीच प्रगती झालेली. अर्थात हा प्रवास मानवी उद्धाराच्या दिशेने होत आहे हे नक्कीच! उदाहरणार्थ प्राण्यामध्ये पाप,घाण,अश्लील भाषा, कला, कविता ह्या कुठल्याच गोष्टीची जाणीव असलेली दिसत नाही. पण मानवामध्ये मात्र जेव्हा आपण मासे, प्राणी ,पक्षी, ह्यांचे सौदर्य न्याहाळतो, त्याचा आनंद घेतो तेव्हा त्याच्यात ह्या भावनाशीलतेचे प्रदर्शन अत्यंत स्वच्छपणे होत असते. खरच, हे मानवेतर प्राणी कधी आपल्यातले सौदर्य न्याहळत असतील? प्रश्नाचे उत्तर आपल्याला ह्या पद्धतीनी देता येईल की मानव जात ही ह्या उत्क्रांतीच्या प्रवासात, इतर सर्व प्राण्यापेक्षा खूप वरच्या टोकावर पोहोचली आहे. म्हणून आपण त्या सर्वांची खूप काळजी घेतो. आपण पक्षांवर प्रेम करतो. माशांच्या जलक्रिडा आपणास आनंद देतो. पण ह्यातली सगळ्यात महत्त्वाची आणि उत्तम गोष्ट म्हणजे आपण आपल्या स्वत:वर प्रेम करतो. आपल्या स्वत:चा आदर करतो. म्हणून आपण आपले शरीर स्वच्छ करतो मन शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करू शकतो आणि आपले हृदय मोकळे, पारदर्शी ठेवू इच्छितो. उत्क्रांतीच्या ह्या प्रवासात आपण सर्वोच्चस्थानी आहोत. त्यामुळे जगाच्या सर्वोच्च स्थानावर विराजमान झालेल्या ह्या मानवजातीचा स्वत:चा उद्धार करून घेणे हा जन्मसिद्ध अधिकारच आहे.

आता मी जे काही तुम्हाला सांगत आहे त्याचा तुम्ही आंधळेपणाने स्वीकार करावा, असे माझे मुळीच म्हणणे नाही. तर त्याच्या तार्किकतेच्या कसोटीवर विचार करा. माझी परत परत तुम्हाला एकच विनंती आहे की तुमचे मन तुम्ही एखाद्या शास्त्रज्ञासारखे खुले ठेवा. जे काही मी सांगत आहे ते नंतर तुम्हाला पटेल तर मात्र अत्यंत प्रामाणिकपणे मनावर घ्या. आत्मशोधाच्या संदर्भातल्या अतिशय चांगल्या विचाराचा स्वीकार तुम्हाला करावाच लागेल. कारण ही गोष्ट तुमच्या फायद्याची, तुमच्या उद्धारासाठीच आहे. तुमच्या आणि तुमच्या कुटुंबाच्या, तुमच्या समाजाच्या आणि पर्यायाने तुमच्या देशाच्या, इतकेच नव्हे तर सर्व जगाच्या फायद्याची गोष्ट आहे.

जे सिद्धांत सध्याच्या शास्त्रिय निष्कर्षाद्वारे किंवा मानसिक नकाशाद्वारे काढले गेले आहेत. ते कोणत्याच अर्थाने आंतरिक सत्याच्या जवळपास देखील पोहचणारे नाहीत. ज्याला अंतिम सत्य जाणून घ्यायचे आहे, त्याला मनाच्या पार पलीकडे अस्तित्वात असलेल्या, तत्वज्ञानाच्या राज्यात प्रवेश करणे गरजेचे आहे आणि हे तेव्हाच शक्य आहे. जेव्हा आपण आत्मउद्धाराच्या सामूहिकतेद्वारे मनाच्यावर प्रवेश करतो.

●●●

# श्रीललितासहस्रनामस्तोत्रातील काही श्लोकांचा अर्थ

श्रीललिताम्बिका महात्रिपुरसुंदरी म्हणजे कुंडलिनी शक्ती होय. या शक्तिची स्तुती म्हणजेच ही सहस्रनामे होत. श्री ललितासहस्रनाम अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. यात भक्तियोग, ज्ञानयोग, कुंडलिनीयोग, श्रीचक्र पूजा आदि अनेक वर्णने श्रीदेवीनामांच्या अनुषंगाने आली आहेत.

श्रीललितांबामातेचा रंग शेंदरासारखा लालीलाल आहे. तिला तीन नेत्र असून तिच्या रत्नजडित मुकुटात अत्यंत कांतिमान असा चंद्र आहे. तिच्या मुखावर स्मितहास्य आहे. तिच्या दोन्ही हातांपैकी एका हातात लाल कमळ आणि दुसऱ्या हातात अमृताने भरलेले रत्नजडित पात्र असून त्यावर भुंगे गुंजारव करीत आहेत. श्रीललितांबामातेचा आकार आणि मुख अत्यंत मनोरम व आकर्षक असून तिचे चरण लाल प्रकाशासारखे आहेत. तिच्या समोर अत्यंत मूल्यवान असा रत्नजडित चौरंग ठेवलेला असून त्यावर तिने आपले चरणकमल ठेवले आहेत. अशा परमश्रेष्ठ श्रीललितांबिकेचे आम्ही ध्यान करतो.

ती श्रीमाता आहे. ती महाराणी आहे. ती सिंहासनाधिष्ठित श्रीमदीश्वरी महाराज्ञी आहे.चैतन्याच्या अग्निकुंडातून तिचा जन्म झाला . देवांची कार्य, देवांची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सफल करण्यासाठी, तिने स्वत:ला प्रकट केले.एकाच वेळी उगवणाऱ्या हजारो सूर्यांची दीप्ती ती धारण करीत आहे. आपल्या प्रेमाने विणलेला पाश तिने आपल्या हाती धारण केला आहे.

तिच्या पावलांवरील बोटांच्या नखाची दीप्ती तिच्या पदतली नत होणाऱ्या भक्तांच्या, पूजकांच्या अंत:करणातील अज्ञानरूपी अंधकार नाहीसा करते, (तिचे ध्यान केल्याने अज्ञान दूर होतो हा भवार्थ)तिच्या दोन्ही तळपावलांच्या शोभेने कमळाच्या सौदर्याला लाजविलेआहे. तिचे तळपाय कमळापेक्षा सुंदर आहेत.

तिची बसण्याची जागा,तिचे आसन पंचब्रह्मांचे बनविलेले आहे.विस्तीर्ण कमलवनामध्ये कदंब वृक्षांच्या राईत ती रहाते. सुधासागराच्या केंद्रभागी तिचे वास्तव्य असते.(येथील कमलवनाचा संबंध सहस्राराशी आहे सहस्रार हे हजार पाकळ्या असणारे कमल. मनुष्याच्या शीर्षभागी असणाऱ्या या सहस्रारात शिव आणि शक्ती एकरूप होऊन राहतात. या सहस्राराच्या कर्णिकेतील चंद्राशी सुधासागराचा संबंध आढळून येतो. )तिचे नेत्रद्वय दयापूरित आहेत. तिची दृष्टी कृपेने भरलेली आहे. तिच्या लोचनात कमनीयता आहे आणि ती आमच्या इच्छा,आकांक्षांना परिपूर्ण करणारी आहे.

देवगण आणि ऋषिगणांच्या प्रचंड समूहाने तिच्या सामर्थ्याचे स्तवन केले आहे.(तिची शक्ती सर्वव्यापी आहे.)श्रीदेवीचे सूक्ष्मतम रूप म्हणजे कुंडलिनी शक्ती होय. ती स्वत:च मूलमंत्र आहे आणि मूलमंत्राच्या तिन्ही भागांनी तिचा सूक्ष्म देह बनलेला आहे. सहस्रदल (गूढ)कमलामृताची विशेष रुची, आस्वाद ती घेत आहे.(सहस्रारातून स्रवणाऱ्या अमृताला-कुलामृत-म्हणतात. श्रीदेवीच्या सूक्ष्म आणि सूक्ष्मतम रूपाचे वर्णन केल्यानंतर आता स्तोत्रकार सूक्ष्मतम रुपाचे म्हणजे मनुष्याच्या मूलाधारात असणाऱ्या कुंडलिनीचे वर्णन करीत आहेत.मूलाधारात सर्पिणीप्रमाणे वेटोळे घालून पडलेल्या कुंडलिनी शक्तीला योगप्रक्रियेने जागृत करण्यात आल्यानंतर ती वरवर वाटचाल करू लागते आणि क्रमाक्रमाने स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी, आणि आज्ञा अशा चक्रांना भेद करून ती शीर्षस्थानी सहस्रारात जाते आणि तेथून साऱ्या शरीरभर पसरलेल्या आपल्या ७२ हजार नाड्यांतून ती अमृताचा स्राव करीत रहाते.

तिचे निवासाचे मुख्यस्थान मूलाधार आहे. या कुलकुंडात ती झोपलेली असते आणि तिचे मुख झाकलेले आच्छादित असते. सुषुम्ना नाडीचे मूळ म्हणजे मूलाधार. मूलाधारावर असणाऱ्या ब्रह्मग्रंथीचा ती भेद करते आणि त्यानंतर मणिपूरचक्रात ती प्रकट होते. त्यानंतर ती विष्णुग्रंथीचा भेद करते. मणिपूरचक्रावर श्रीविष्णूचे वास्तव्य असते म्हणून येथील ग्रंथीला विष्णुग्रंथी असे म्हणतात.

आज्ञाचक्राच्या अंतर्भागी ती निवास करते. सहस्रदलकमलात प्रवेश करते आणि तेथून खाली अमृताचे स्रोत पाठविते. अमृताच्या स्रोतांचा वर्षाव करते. या सहस्रदलकमलाच्या कर्णिकेच्या चंद्रातून अमृत ठिपकत असते.विजेच्या झगझगाटाप्रमाणे, लखलखाटाप्रमाणे तेजस्वीपणे चमकणारी अशी ती स्वत:ला सहा चक्रांच्यावर स्थापन करते. ती नेहमीच फार उत्सवप्रिय असते.ती वेटोळे घातलेल्या सर्पासारखी आहे आणि कमलाच्या देठातील बारीक तंतूप्रमाणे ती बारीक व सुरेख आहे.

ती भवानी आहे. ती ध्यानलभ्य, ध्यानप्राप्य आहे. ध्यानाने चिंतनाने तिची प्राप्ती होऊ शकते. जे सारे काही कल्याणदायी आहे ते तिला आवडते. ती मांगल्यप्रिय आहे. ती स्वत:च मांगल्याची, कल्याणाची मूर्ती आहे. तिचे रूप मंगलदायी,कल्याणकारक असे आहे. ती आपल्या भक्तांना वैभव, सौभाग्य देते.

आपले भक्त तिला आवडतात. ती आपल्या भक्तांवर प्रेम करते. (किंव्हा त्यांची भक्ती तिला प्रिय आहे.भक्ती केल्यामुळे ती प्रमुदित होते, संतुष्ट होते) भक्तीने ती वश होते. तिच्यापाशी जाण्याचा मार्ग भक्ती हा आहे. भक्तीने तिला जिंकता येते. सर्व प्रकारचे भय भीती ती निवारण करते. ती शंभुपत्नी-शिवपत्नी शांभवी आहे. सरस्वती सुद्धा तिची आराधना करते. सरस्वतीने, शारदेने देखील तिची पूजा केली आहे. ती शर्वणी, शिवपत्नी आहे. ती आम्हाला सुख देणारी आहे भक्तांना सुख देणारी आहे.

ती शांकरी आहे, ती शंकराची पत्नी आहे. ती यश,लक्ष्मी, वैभव(संपत्ती)देणारी आहे. ती सद्गुणी,साध्वी, सती,पतिव्रता आहे. शरदऋतुतील चंद्राप्रमाणे तिची मुखकांती आहे. तिचे मन शांतीने भरलेले आहे. ती विश्वाचा खरा आधार आहे. तिला स्वत:ला कसल्याही व कोणत्याही आधाराची,आश्रयाची अपेक्षा नाही.(ती निष्कलंक आहे.(अज्ञानी जीवाला जडलेले दोष तिच्या ठिकाणी नाहीत.)

ती निर्लेप आहे.(कर्मफलाचे दोष तिला चिकटत नाहीत. पद्मपत्र जसे पाण्यापासोन अलिप्त असते त्याप्रमाणे ती निर्लिप्त असते) ती निर्मल आहे. (अविद्येमुळे उत्पन्न होणारे दोष,अंधार, गोंधळ, डाग इत्यादींपासून ती मुक्त आहे)ती शाश्वत, सनातन व नित्य आहे. ती निराकार आहे.ती निर्गुण आहे. ती सदा शांत असते.ती अविनाशी आहे. ती नेहमी मुक्त असते. ती सदा शुद्ध आहे. ती चित्स्वरूपिणी असल्यामुळे ती नेहमी ज्ञानमय असते. तिच्यात दोष नाहीतच. तिच्यापाशी सजातीयता, विजातीयता आदि भेद नाहीत. ती अंतर न ठेवणारी अशी पूर्णा, संपूर्ण आहे.ती कारणरहित आहे.

(ती सर्वश्रेष्ठ असल्यामुळे तिला श्रेष्ठ असणारे अन्य कोणीही नाही.)काम,क्रोध,लोभ,मोह,मद व षड्रिपूंची बाधा तिला होत नाही. भक्तांच्या इच्छा ,द्वेष आणि जीवनासक्ती यांना घुसळून टाकून त्यांचा ती समूळ नाश करते. ती मदरहित, गर्वरहित असून ती साऱ्या गर्वाचा, मदाचा नाश करते. ती चिन्तारहित आहे व तिला अहंकार नाही. ती मोहरहित आहे, मोह-भ्रम, चित्तविभ्रममनाचा उडणारा गोंधळ तिच्यापाशी नाही. ती साऱ्या मोहाचा नाश करते. तिला स्वार्थ नाही.साऱ्या स्वार्थीपणाला, ममताभावाला ती नष्ट करते. ती पापरहित निष्पाप आहे आणि ती सर्व पापांचा नाश करते.

ती क्रोधरहित आहे. (कारण ती कोणाचा द्वेष करीत नाही)आणि ती साऱ्या क्रोधाला नष्ट करते. ती लोभरहित आहे आणि ती साऱ्या लोभाचा नाश करणारी आहे. ती संशयरहित आहे आणि ती साऱ्या संशयाला नाहिसे करते. ती अजन्म आहे. अभवा, संसार नसणारी आहे आणि ती जन्म-मृत्यू असणाऱ्या संसाराचा नाश करणारी आहे.

तिला विकल्प,अनिश्चितपणा माहीतच नाही. तिचे ज्ञान विकल्परहित आहे.खोट्या कल्पना नसलेले निश्चित ज्ञान तिच्या जवळ आहे. द्रष्टा व दृश्य असे भेदाचे ज्ञान नाही. ती भेदरहित आहे ती सर्व भेदांचा नाश करणारी आहे.दुष्ट पापीजनांकरीता ती नेहमीचफार दूर असते.दुराचारांचा ती शेवट करते. ती रागद्वेषादि दुष्टकर्मापासून मुक्त आहे. ती सारे काही जाणणारी आहे. ती करुणाघन आहे.,करुणामय आहे.तिचा समान तिच्या बरोबरीचा कोणीही नाही किंवा तिच्याहून श्रेष्ठ कोणी नाही.ती सर्वशक्तीमयी आहे. ती पूर्ण मंगलमयी आहे. ती आपणाला सन्मार्गावर घेऊन जाणारी आहे.

सर्व यंत्राचा ती आत्मा आहे. सर्वतंत्रे तिचे रूप आहे,तिचे शरीर आहे. ती महेश्वरपत्नी आहे.ती महादेवी आहे. ती महालक्ष्मी आहे ती शिवाची प्रिया आहे.तिचे रूप फार मोठे आहे. ती फार मोठे पूजाविषय आहे. (शिवादि देवगणांनी देखील तिला आराधिले आहे.)ती मोठमोठया हिडीस पातकांचा देखील नाश करते. ती सर्वात मोठी माया आहे. ती सर्वात मोठे सत्य आहे. तिची शक्ती अफाट, अमर्याद आहे. तिचा आनंदही असीम आहे. (महाकामाची पत्नी महारती)

ती फार मोठा विस्तार आहे. ती फारमोठे सुख आहे, धन आहे. ती फार ऐश्वर्यशालीन आहे. ती फार मोठे सामर्थ्य आहे. ती फार मोठे शौर्य आहे. ती फार मोठी बुद्धी आहे. ती मोठमोठ्या योगेश्वरांची ईश्वरी आहे.ती स्वत:च सर्वात मोठा मंत्र आणि सर्वात मोठे यंत्र आहे. महाभैरव श्रीशिवाने सुद्धा तिची पूजा केली आहे.

कामाला जिंकणाऱ्या महाकामेश्वराची ती पत्नी पट्टराणी आहे. त्रिपुराची, तीन नगराची-माता आहे.चौसष्ठ, कलांनी, (शास्त्रांनी)ती परिपूर्ण आहे आणि ६४ कोटी महायोगिनींचा समुदाय तिच्या सेवेस सज्ज आहे.

ती चंद्रमंडलाच्या मध्यभागी राहते.(येथे चंद्रमंडलाचा अर्थ सहस्रारातील कर्णिका असा घ्यावा; कारण सहस्रदलकमलाच्या कर्णिकेतील चंद्रबिंबात कुंडलिनी आपले ठाणे मांडीत असते. रहस्यार्थ असा की, चंद्रबिंब म्हणजे श्रीचक्रच होय.)तिचे लावण्य सुंदर आहे. तिचे हास्य सुंदर आहे. ती सुंदर चंद्रकला-चंद्रकोर धारण करीत आहे.

चराचर, सजीव-निर्जीव, स्थावर-जंगम जगतांची तू अधीश्वरी राज्ञी आहेस. चक्रराज किंवा श्रीचक्र हे तुझे निवासस्थान

आहे.ती पार्वती आहे. तिचे डोळे कमळासारखे आहेत आणि माणिकरत्नाप्रमाणे ती तेजाळ आहे किंवा ती कमळाच्या लालरंगासारखी आहे. पद्मरागसमप्रभा हे नाम अमृतकुंडलिनीचेही असू शकते; कारण कुंडलिनीचा रंग केशरीगंधासारखा असतो.

ती शुद्ध चैतन्य आहे आणि ती परमनन्दमय आहे. उत्कृष्ट आनंद हेच तिचे रूप आहे. विज्ञान हेच चैतन्य व त्या चैतन्याचे साररूप असणारी ती आहे. चैतन्याशी विज्ञानाशी समरस झालेले तिचे रूप आहे. शाश्वत सखोल ज्ञान असणारी अशी ती आहे.

ती स्वत: ध्यानरूपा आहे. ती स्वत:च ध्यान करणारी व्यक्ती आहे आणि तशीच ती स्वत: ध्यानाचा विषयही आहे. ईश्वराशी एकरूप असलेली म्हणून -ईश्वरी-आणि सदाशिवाहून भिन्न नसणारी म्हणून-सदाशिवा- आहे.सूर्यबिंबाच्या केंद्रभागी तिचा निवास आहे. ती भयंकर भैरवी आहे. भैरवपत्नी म्हणजे परमशिवाची पत्नी, आहे. ती भाग्याची माला, षड्गुची माला देखील धारण करीत आहे. ब्रह्मापासून ते कीटकापर्यंत ती सर्वांची जन्मदात्री आहे. धर्म-अधर्म, सत्-असत, चांगले-वाईट, पाप-पुण्य यांची फळे देणारी तीच आहे.

वेद तिच्या पायी डोके टेकतात, तिला दंडवत घालतात तेव्हा तिच्या नाजुक पदकमलांची धूळ वेदांच्या,श्रुतींच्या मस्तकी असणाऱ्या केशकलापाच्या ऐन मध्यभागास,कुंकवाच्या रंगाने शोभिवंत करते. सर्व वेदांचे समूह हे (मोत्यांच्या)शिंपल्यासारखे असून श्रीदेवी मात्र खरोखरीच आतील अमूल्य मोत्याप्रमाणे आहे.

ती चतुर्विध पुरुषार्थ देणारी आहे. ती स्वत:पूर्णता आहे. ती सुखाने, आनंदाने परिपूर्ण आहे. ती सुखाचा उपभोग घेणारी आहे. ती चतुर्दश भुवनांची, चौदा जगतांची स्वामिनी आहे. ती सर्वांची माता आहे. ती अनादि आणि अनंत आहे. विष्णू,ब्रह्मा आणि इंद्र तियेही तिची सेवा करतात.

ती नारायणाचे दुसरे रूपच आहे. नाद हे तिचे रूप आहे ती नाम आणि रुप यांच्या अतीत आहे. ती काही टाकीत नाही आणि काही स्वीकारीत नाही.स्वत:कुबेराने तीची पूजा केली आहे. कारण ती महाराणी आहे. ती सौदर्यवती आहे. तिचे डोळे कमळाप्रमाणे आहेत. ती भक्तांना रमविणारी, आनंद देणारी आहे. रुणझुण आवाज करणाऱ्या घुंगरांचा कमरपट्टा तिने परिधान केला आहे.ती स्वत: लक्ष्मी(रमा)आहे. ती राक्षसांचा वध करणारी आहे. ती विश्वाला निर्माण करते आणि विश्वाचे पालन-पोषणही करते. ती वेदांची जननी आहे. ती वेदांचे उगम-स्थान आहे. ती श्रीविष्णूची माया आहे.ती सदा विजयी आहे. ती विमल, शुद्ध आहे. ती वंद्य,पूज्य व पूजनीय आहे. तिचे पूजक तिला आवडतात आणि या पूजकांच्या वाणीत तिचा वास -निवास असतो. वाणीला बिलविणारी व वदविणारी तीच आहे.

तिच्या भक्तजनांकरिता ती स्वत:च कल्पवृक्ष आहे, कल्पलता आहे. ती सर्व पाखंडी लोकांचा नि:पात करते आणि लोकांना ती सदाचाराकडे प्रवृत्त करते.संसाररुपी अग्नीने जळलेल्या व संत्रस्त झालेल्या लोकांना ती शीतल चंद्रप्रकाशाप्रमाणे आनंद देत असते.

ती कामेश्वराची प्राण-नाडी,जीव-नाडी आहे. जी काही चांगली वाईट कामे मनुष्ये करीत असतात ती सर्व तिला माहीत होत असतात.ती नेहमीच दयार्द्र असते ती अप्रतिम आहे. ती निस्तुला आहे आणि ती अवर्णनीय सुख देणारी आहे. ती मोक्षाचे सुख देणारी आहे. ती सोळा नित्यदेवतांच्या रुपात आहे.

ती स्वत:च तेज आहे, प्रभा आहे. ती फार थोड (उत्कृष्ट) स्वामिनी आहे. तीआदिकारण आहे. तिचे रूप प्रकट आणि अप्रकट असे दोन्ही प्रकारचे आहे.ती सर्वव्यापी आहे. तिची निरनिराळी रुपे आहेत. ज्याप्रमाणे सूर्यकिरणे जगाचा अंधार दूर करतात त्याप्रमाणे आपल्या भक्तांचे अज्ञान ती नाहीसे करते.श्रीशिवाच्या रूपाने ती राहते. सर्व धार्मिक जन तिला प्रिय असतात. किंवा ज्ञानी लोक तिची इच्छा करतात आणि सर्व सन्मार्गगामी लोक तिची आराधना करतात. ती अमेय,अनंत,असीम आहे. ती स्वयंप्रकाशी आहे. ती आपल्या मनाचा आणि वाचेच्या टप्प्याबाहेर, टप्प्यापलीकडे सीमेबाहेर, मर्यादेबाहेर आहे

ती चैतन्याची शक्ती आहे, ती स्वत:च चैतन्य आहे. चेतनारूपात ती आहे. तसेच जड सुष्ट वस्तूंची शक्तीही तीच आहे. ती जडवस्तूंच्या अगदी अंतर्यामीचे सत्व आहे. बाह्य सृष्ट जगत तिच्यामुळेच आहे.मनुष्याचे पाच कोश म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय हे होत. या पाच कोशांच्या आतमध्ये श्रीदेवी (ब्रह्न)वसत असते. ती चिरतरुणी आहे.

ती कुलस्वामिनी कुलदेवता आहे.ती कुलकुंडात राहणारी देवता आहे. कुलकुंड म्हणजे मूलाधार. हे देवीचे एक निवासस्थान आहे. ती कुमार आणि गणनाथ (स्कंद आणि गणेश)अशा दोघांचीही माता आहे. ती तृष्टी (सुख-संतोष)आहे. ती पुष्टी (परिपूर्ण)आहे. ती मती (बुद्धी-ज्ञान)आहे. ते धृती (धैर्य)आहे. ती शांती (गंभीरत्व) आहे. परमसत्य, शाश्वतसत्य आहे. (ती नेहमी असणारी अशी आहे.)

तिचे डोळे कमलाप्रमाणे आहेत. ती सुरांची-देवांची-

नायिका-इश्वरी-स्वामिनी आहे.ती नीलकंठाची, कालकंठाची पत्नी आहे. ती कांतिमयी-झळकते तेज असणारी आहे. पण तिचे रूप सूक्ष्म आहे. ते रूप जाणवायला, पाहावयाला अवघड आहे. अणूपेक्षाही सूक्ष्म, सूक्ष्माहूनही सूक्ष्म आहे. स्थूल सूक्ष्म आणि पर या तीन रूपातील दुसरे तिचे रूप आहे.

विशुद्धिचक्रनिलया म्हणजे षोडशदलकमलाच्या कर्णिकेत राहणारी, निवास करणारी. मनुष्यात असणाऱ्या सात चक्रांच्या सात अधिष्ठात्री योगिनींशी देवतांशी देवीची एकरूपता आहे.अज्ञानी जीवांना म्हणजे अद्वैतज्ञान नसणाऱ्या जीवांना, पशूंना ती घाबरुन टाकते (भिवविते)ती अमृता आणि अन्य मोठ्या सोळा शक्तींनी परिवेष्टित आहे.

ती अनाहत चक्रामध्ये असते तेव्हा तिचा श्यामवर्ण असतो. कमळाच्या कर्णिकेत ती रहाते. सोळा वर्षे वयाच्या मुलीप्रमाणे श्यामल वर्णाची. मनुष्याच्या रक्तात तीचा निवास आहे. कालरात्री शक्तीसह अनेक शक्तीसमूह तिच्या सेवेत सिद्ध आहेत.

ती मज्जाधातूची अभिमानी आहे. मज्जेवर तिचे अधिष्ठान आहे. ती मज्जारूढ आहे आणि हंसवतीसह अन्य देवता तिच्या सेवेस सिद्ध आहेत. (हंसवती आणि क्षमावती अशा दोन शक्ती आज्ञाचक्रातील कमळाच्या दोन पाकळ्यांवर रहातात आणि तिची सेवा करतात)सहस्रारचक्रात (सहस्रदलाकमलात)जेव्हा ती राहते तेव्हा ती सर्व रंगांनी (पांढरा,लाल,श्यामल-लाल, पिवळा)शोभिवंत असते. (ती तेजस्वितेने चमकते)

आकाशापासून ते जगतापर्यंत सर्वाचा आरंभ,जन्म तिच्यापासून आहे. (आत्म्यापासून आकाश,नंतर वायू,नंतर अग्नी, त्यानंतर पाणी, नंतर पृथ्वी, तदनंतर औषधी, नंतर अन्न व त्यानंतर मानव) सर्व रोगराईना व आजारांना ती दूर करते.

सदा सर्वदा ती तृप्त, संतुष्ट, सुखी असते. ती भक्तांना नयन करणारी (मार्गदर्शन करणारी)आहे. ती जगाचे नियमन करणारी आहे, जगच्चालक आहे. सर्वांची ती स्वामिनीही आहे. महाकैलास हे तिचे निवासस्थान आहे. (सध्या ओळखल्या जाणाऱ्या कैलास पर्वताच्या फार पलीकडे 'महाकैलास' आहे. हे परमशिवाचे राहण्याचे ठिकाण आहे. महाकैलासासारख्या महासाम्राज्याची ती महाराज्ञी आहे.

ती आत्मविद्या आहे. ती श्रीविद्या आहे. ती हृदयात रहाते (असते)आणि सूर्याप्रमाणे प्रकाशते आणि त्याखाली ती त्रिकोणाकृती अग्नीच्या स्वरुपात असते. ती दैत्यांचा वध करणारी आहे. ती गोमाता आहे. ती वाणीची, वाचेची माता, जननी आहे. तसेच ती कुमारांचीही माता आहे. देवांची ती स्वामिनी आहे. देवांवर तिची सत्ता आहे. ती न्यायासनावर बसलेली आहे.

ती आदिशक्ती आहे. सर्व जगतांच्या निर्मितीचे मूळ कारण अशी ती आरंभाची शक्ती आहे. तिला कोणत्याही मापाने, मानाने मोजता येणार नाही.तिच्या ज्ञानाने आपण पवित्र, शुद्ध होतो. कित्येक कोटी विश्वांना तिने जन्म दिला आहे. कित्येक कोटी जगतांची निर्मिती तिने केली आहे. अंतरिक्षात जन्म झाल्यामुळे ती दिव्य देहधारी आहे.

तिच्या गर्भात विश्व सामावलेले आहे. सोन्याच्या गर्भातून ती स्वत:जन्मली, ती अपवित्र लोकांचा, असुरांचा वध करणारी आहे. ती दुष्ट असुरांचा वध करते. ती वाणीची, भाषेची, वाचेची आधिष्ठात्री देवता आहे. (ती वाक्स्वामिनी आहे) ध्यानाने तिची प्राप्ती होऊ शकते. तिला ओळखता येते,

तिला जाणता येते. ती अनंत अपार आहे. स्थलकालाच्या मर्यादेत ती बसू शकत नाही. स्थलकालाने ते सीमित नाही. ती ज्ञानदात्री आहे. ज्ञान हाच तिचा विग्रह म्हणजे देह आहे. ती स्वत:च परमोच्च ज्ञानाच्या स्वरूपात असते.)

ती परम सत्य आहे. ती परम आनंद आहे. सत्य आणि आनंद हे तिचे रुप आहे. परंतु ती दिसू शकत नाही. जे काही पाहता येते, त्याच्या पलीकडे ती आहे.योगात अनुभवास येणारा आनंद तीच आहे. आत्मप्रचीती, आत्मानुभव, आत्मसाक्षात्कार यातील आनंद हेच देवीचे रूप आहे. ती साऱ्या जगताला वाहते म्हणजे साऱ्या जगताचा निर्वाह चालविते. ती इच्छेची शक्ती आहे आणि ती क्रियेची शक्ती आहे. ती सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी आहे. ब्रह्म आणि आत्म्याच्या ऐक्याचे ती प्रतिक आहे. ती दिव्यज्ञान आहे. ती अनंताचे, शाश्वताचे ज्ञान आहे.

सहजसाधेपणे तिची आराधना करता येते, ती शुभ करणारी, चांगले करणारी आहे. हितकर आहे आणि सहजी होण्याऱ्या उपासनेमुळे तिचा मार्ग सोपा,सुलभ आहे.तिचा हा मार्ग सरळ आणि सुलभतेने प्राप्त होणारा आहे.

तिच्या अनुग्रहीतांना ती ज्ञान देते आणि त्यांची पापे नाहीशी करते म्हणून तिला-दीक्षिता- म्हटले आहे. ती दैत्यांचा नाश करणारी आहे. सर्व जगतांना ती आपल्या ताब्यात ठेवणारी आहे. ती जगताला प्रसविते, निर्माण करते म्हणून ती-सावित्री-होय. ती शुद्ध सत-चित-आनंद आहे.देश, काल या मर्यादेने ती बांधलेली नाही. सर्व वस्तूत तिचे अस्तित्व आहे. ती सर्वसाक्षी आहे. सर्व पदार्थामात्रात

ती अभिन्नपणे वास करते. देवी झाडांमध्ये,पृथ्वीत, वायूमध्ये, आकाशात, पाण्यामध्ये अग्नीमध्ये सर्व स्वरूपात निरनिराळ्या नावांत वास करते. ती सरस्वती आहे. ज्ञानदेवता आहे. ती सर्व शास्त्रे आहे. ती सर्व विद्या आहे. तीच्या ह्रदयाच्या गुहेत, ह्रदयाकाशात छायारुपाने राहणारी माता आहे. तिचे रुप फार सूक्ष्म आहे ती अत्यंत गुप्त रुपात असते. साध्या दृष्टीला ती दिसत नाही.

सर्व बंधनांपासून ती पूर्णपणे मुक्त आहे. ती परंपराप्राप्त ज्ञानाचा झरा आहे. पवित्र परंपरेची, पवित्र संप्रदायाची ती रक्षणकर्ती आहे.ती माया शक्ती आहे. ती गूढ, अचिन्त्य, अनाकलनीय मायाशक्ती आहे. ती श्रीगणेशाची माता आहे.

ती स्वतंत्र आहे. ती स्वत:ची स्वामिनी आहे.(साधने, उपकरणे किंवा साहित्य यावर अवलंबून न रहाता ती निर्मितीचे कार्य करीत असते म्हणून ती -स्वतंत्रा- आहे. स्व म्हणजे आत्मीय स्वाधीन, असा परमशिव: त्याच्या अधीन असणारी म्हणून स्वतंत्रा किंवा परस्पराधीन असणारी.साऱ्या चौसष्ट तंत्रांची ती अधिष्ठात्री देवता आहे. स्वामिनी आहे.

चिद् म्हणजे ब्रह्म, सत् चित् आणि आनंद. कला म्हणजे अंश. मनुष्याच्या मनामध्ये मनुष्याच्या चित्तामध्ये वास करणारी शक्ती ती चित्कला आनंदकलिका म्हणजे आनंदाचा कण, आनंदमय कोशाची कळी. सारेजीव, सर्व भूतमात्रे या आनंदाच्या अंशामुळेच जगतात. प्रेम -स्नेह-भक्ती हेच तिचे स्वरूप आहे.

ती महाराज्ञी, महास्वामिनी (माहेश्वरी)आहे. ती महाकाली आहे. ती अर्पणा आहे. ती चंडीका आहे.ती चंड आणि मुंड दैत्याचा वध करणारी आहे.तीच साऱ्या विश्वाला अधार देणारी आहे. ती भाग्य-देवता आहे ती स्वर्गातील सुखे आणि मोक्षाचे शाश्वत सौख्य अशी दोन्ही सौख्ये देणारी आहे. ती शुद्ध आहे. अविद्येची मलिनता तिला स्पर्शत नाही म्हणून शुद्ध जास्वंदीच्या फुलाप्रमाणे तिचे स्वरूप आहे. ओजतेज, धातूतील चैतन्य, प्रकाश, बल आणि कांती,देवीजवळ हे सारे आहे म्हणून ती ओजोवती आहे. ती कांतिमती आहे. ती यज्ञरूप म्हणजे श्रीविष्णुरूप आहे.ती विराट आहे. ती विराटस्वरुपी,विश्वरुपिणी, सर्वसाक्षी आहे. ती पाप-कल्मष-रहित आहे. सर्व दिशांकडे तिचे तोंड आहे. ती प्रत्येक मार्ग पाहणारी आहे. ती अंतर्निहित असे आत्मतत्व आहे.

ती प्राणदात्री आहे. ती स्वत:च प्राणरूप आहे.ती सत्य, ज्ञान आणि आनंद आहे. शिव आणि शक्ती या दोन्हीपैकी ना कोणी कमी ना कोणी अधिक अशी अवस्था असणे ते सामरस्य. असे सामरस्य हे तिचे परम स्थान आहे. ती आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी कामधेनु आहे.

ती सर्व कलांचे भांडार आहे. ती स्वत:च रसभांडार आहे(ब्रह्ममृताचा साठा)ब्रह्मरसाने परिपुष्ट असणारी अशी ती आहे. सर्व भूतमात्रात ती अति प्राचिन आहे.ती उत्कृष्ट अशी ब्रह्मज्योत आहे. ब्रह्मात्मक प्रकाश आहे. ती ज्योतीची ज्योती म्हणजे आत्मज्योती आहे.

ती भक्तीने प्रसन्न होते. योगीजनांच्या मानससरोवरातील हंसी आहे सत्य हेच तिचे व्रत आहे. सत्य भाषण करण्याचे व्रत घेणाऱ्यांना तिची प्राप्ती होते. ती स्वत:च सत्य आहे. त्रिकालाबाधित सत्य हे तिचे रूप आहे. ती सर्वांच्या अंत:करणात प्रविष्ट आहे. ती सर्व पदार्थमात्रांना व्यापून आहे. ती सर्वांच्या इंद्रियांचे नियमन करणारी आहे. ती सर्वस्वरुपी आहे.

ती ब्रह्माचा आत्मा आहे. ती स्वत:च ब्रह्म आहे. सर्व प्रपंचाला, संसाराला जगताला, विश्वाला उत्पन्न करणारी जननी ती आहे. तिची पुष्कळ रुपे आहेत. ज्ञानी लोक तिची पूजा करतात. तिने आकाशादि प्रपंचाला,जगताला, प्रजेला, जन्म दिला. ती प्रचंड आहे. खरेच ती सर्व पदार्थाचे मूळ आहे.

ती इंद्रियांचे अधिष्ठान असल्यामुळे इंद्रियांची, प्राणांची ईश्वरी आहे. स्वामिनी आहे. ती बंधमुक्त आहे. ज्ञानीजनांच्या अंत:करणात ती राहते. चालना दिली. ती या संसारचक्राला एखाद्या चाकाप्रमाणे फिरवीत आहे.

ती वेदांचे सार आहे. वेद, उपनिषदात तिचे स्थिर रूप आढळते. ती शास्त्रांचे सार आहे. ती मंत्रांचे सार आहे. तिची कीर्ती फार मोठी आहे. फार विस्तृत आहे. तिचे वैभव अमर्याद आहे.साऱ्या उपनिषदांनी तिला उच्च स्वरात उद्घोषिले आहे. ती अगाध, अनंत, मोठ्या सरोवराच्या स्वरूपाची आहे. (गंभीर मोठे सरोवर; खोल, कुट,तळ न लागणारी )ती सर्व आकाशाला व्यापून टाकणारी आहे. ती गानप्रिय आहे. ती कल्पनेच्या (विश्वाच्या)पलीकडे आहे.

कारण आणि कार्य (हेतू आणि परिणाम) या नियमाने ती बांधलेली नाही. कार्य-कारण नियमापासून ती मुक्त आहे. तळपणाऱ्या सोन्याची कर्णभूषणे तिने धारण केली आहेत. ती सहजासहजी, खेळत, खेळत, तिला रुचेल, आवडेल असे रूप धारण करते.

ती जन्मरहित आहे. अजन्म आहे. ती क्षयापासून,मरणापासून

पूर्णत: मुक्त आहे. ज्यांची दृष्टी अंतर्मुख झाली आहे, त्यांच्याकरीता ती उपासना -सुलभ आहे आणि ज्यांची दृष्टी बहिर्मुख आहे त्यांना श्रीदेवीची प्राप्ती होणे कठीण आहे. दुर्लभ आहे.

ती रोगमुक्त आहे. ती सर्वांना आधार देणारी, आश्रय देणारी आहे. तिला कोणाच्याही आधाराची, आश्रयाची आवश्यकता नसते. आपण आपल्याच (स्वत:च्याच)आनंदात ती रमलेली असते. उत्पत्ती आणि प्रलय अशा दोन्ही काळी ती एकाकी असते. म्हणून ती स्वत:शीच रमलेली असते.ती खरोखरी अमृताचा झरा (प्रवाह, स्राव) आहे. सहस्रारकमलाच्या कर्णिकेच्या चंद्रात असणारे, अमृत प्रवाहरुपाने कुंडलिनी द्वारा (कुंडलिनीमधून) वाहते, धावते, ही कुंडलिनी श्रीदेवीच होय.

संसाराच्या चिखलात पूर्ण बुडालेल्या लोकांना वर काढण्यात त्या लोकांचा उद्धार करण्यात: त्यांना वाचविण्यात ती फार कुशल आहे. यज्ञ तिला आवडतात. यज्ञ तिला प्रिय आहे. ती धर्माचा आधार आहे. धर्माला तिचा आश्रय आहे. ती धनाची स्वामिनी आहे. धन आणि धान्य (संपत्ती आणि अन्नधान्य) दोन्हींची विशेष वृद्धी,समृद्धी तिच्यामुळेच होते.विद्यावंतांच्या रूपात ती स्वत:ला प्रकट करते. सर्व विश्वाचे भ्रमण (उत्पत्ती,स्थिती व लय)हे चक्र ती करविते, ती घडविते, ती विश्वांना फिरविते, भ्रमविते. श्रीविष्णूच्या सर्व शक्ती तिच्यापाशी आहेत. श्रीविष्णू हेच तिचे रूप आहे म्हणजे श्रीविष्णुहून ती निराळी नाही. ती कार्य आहे पण कारणरहित आहे. ती सर्वांचे आरंभ-स्थान आहे. ती अपरिवर्तनशील आहे.

ती कर्मापासून मुक्त आहे तिने कर्माचा त्याग केला आहे. ती कर्माने बांधलेली नाही, लिप्त नाही. ती नादरूप आहे. ब्रह्मसाक्षात्काराचा स्वात्मसाक्षात्कार ती आहे. साक्षात ज्ञानाचा आत्मसाक्षात्कार घडविणारी ती आहे. सर्व कलांमध्ये ती प्रवीण आहे.

ती सर्व तत्त्वांच्या अतीत आहे. ती स्वत:च अंतिम सत्य आहे. आत्मतत्व, विद्यातत्त्व आणि शिवतत्त्व अशा तिन्ही तत्त्वाच्या स्वावलंबी आहे. ती स्वत:च्या माहात्म्यांतच रहाणारी आहे. तिचा स्वभाव मधुर, अभिलक्षणीय आहे.

चैतन्याच्या अर्धानी तिला उत्तम प्रकारे आराधिण्यात येते. चैतन्य हा आत्मा होय. चैतन्याची फुले तिला फार आवडतात. ती स्वप्रकाशामुळे नेहमी उद्‌यवती असलेली आहे. ती सदा संतुष्ट असते (सज्जनांशी ती नेहमी संतुष्ट असते)आणि सकाळच्या उगवत्या सूर्याप्रमाणे तिचा रंग नेहमीच गुलाबी तांबडा असतो.

तिचे कोमल (कमल)मुख नेहमी किंचित स्मिताने अलंकृत असते. शोभिवंत असते. ती अमूल्य असे मोक्षपद,अंतिम आनंदावस्था, देणारी आहे.ती स्तुतिप्रिया आहे. तिला तिची स्तुती केलेली आवडते. तिची स्तुती केल्याने ज्ञान, ऐश्वर्य प्राप्त होते. वेदांनी तिचे वैभव वाखाणले आहे. ती महेशी म्हणजे महेशाची पत्नी आहे.तिचे रूप मंगल आहे.तिचे स्वरुप कल्याण करणारे आहे.

ती विश्वाची,जगताची माता आहे. ती जगताचे रक्षण करणारी, सांभाळ करणारी आहे. ती अत्यंत धैर्यशील,बलशाली आहे. ती फार उदार आहे. आणि ती अत्यंत आनंदी आहे. तिचे ऐश्वर्य शाश्वत,चिरंतन असे आहे. कायमचे सुख देणारी आहे. ती पृथ्वीस्वरूप आहे; कारण सर्व जगताचे धारण ती करते.ती त्रिगुणांबा आहे. तिचे कार्य आश्चर्यचकित करणारे आहे आणि आम्ही इच्छिलेले सारे काही विषय (वस्तू) ती आम्हाला देते.

श्री सदाशिव, श्रीविष्णूपासोन तो मूलांपर्यंत सर्वजण तिला जाणतात, ओळखतात. श्रीचक्रराज हे तिचे निवासस्थान आहे. (श्रीचक्रात बिंदू,त्रिकोण आदि समाविष्ट आहेत. श्रीचक्र हे श्रीशिव आणि शक्तीचे (देवीचे) शरीर आहे. भावार्थ असा की, जीव ज्याप्रमाणे शरीरात राहतो त्याप्रमाणे श्रीचक्रात श्रीशिव-शक्तीचे,श्रीशिव-देवीचे वास्तव्य असते ) ही दिव्य श्रीत्रिपुरसुंदरी आहे.

ती श्रीशिवा आहे, श्रीशिव स्वत:च ती आहे म्हणून ती श्रीशिवा आहे. ती खरोखरी शिव आणि शक्तीच एके ठिकाणी, एका स्वरूपात आहेत. शिव आणि शक्तीचे पूर्ण ऐक्य अशी ती आहे. वारा आणि त्याचे हलणे एकत्र,एकच असते, अग्नी आणि त्याची उष्णता एकत्र, एकच असते, चित् आणि शक्ती एकत्र, एकच; त्याप्रमाणे श्रीशिव आणि श्रीशक्तीची नेहमी एकात्मता, एकच एक ऐक्य असते. श्री शिव आणि शिवशक्त्यैकरूपिणी ही दोन नामे श्रीशिव आणि शक्तीच्या एकरुपतेस आणि संपूर्ण ऐक्यास, सामरस्यास दर्शवितात. ही ती श्रीललितामाता आहे.

● ● ●

**॥ तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥ करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥**

# सहस्त्रार पूजा, मे २००७













# प्रतिष्ठान, पुणे
















